अंतर्मन शुद्ध करा, चराचरात भगवंत दिसेल! -प.पू. अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी

पान २ वर



RNI No.: MAHBIL/2016/68485

www.acrossstates.com

मराठी

# अक्रॉस मुंबई

संपादक - संजय मंगेश भैरे



विधान परिषदेचा 'नऊ'चा आकडा कुणाला तारणार, कुणाला मारणार? महायुतीचे पारडे जड

पान ३ वर



वर्ष: ११ अंक :१७ ■ मुंबई, मंगळवार २४ ते ३० मार्च २०२६ मूल्य - ५.०० रुपये ■ पाने - ८


## “डोनाल्ड ट्रम्प यांनी माघार घेतली”

### युद्ध स्थगितीच्या निर्णयावर इराणने अमेरिकेचे दावे फेटाळले

**तेहरान, वृत्तसंस्था**

मध्य पूर्वेतील तणाव कमी होण्याच्या दृष्टीने अमेरिका आणि इराम यांच्यात चर्चा सुरू असून त्यातून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या चर्चा सकारात्मक सुरू असून पाच दिवसांची स्थगिती देण्यात आल्याची माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड



ट्रम्प यांनी दिली. मात्र, हा दावा इराणने फेटाळून लावला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी माघार घेतली असून युद्ध स्थगितीचे आदेश दिले असं अफगाणिस्तानमधील इराणच्या दूतावासांनी म्हटले आहे.

होर्मुझची सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली करा, अन्यथा इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले करू, असा थेट इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता. त्यांच्या या इशाऱ्याला गांभीर्याने घेऊन इराणने शत्रू देशांना वगळता इतर देशांकरिता हा मार्ग खुला केला. इराणने अमेरिकेच्या आदेशाचे पालन केल्याने अमेरिकेनेही आता इराणवरील ऊर्जा प्रकल्पांवरील नियोजित हल्ल्यांना स्थगिती दिल्याचे वृत्त समोर आले होते.

याबाबत डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, “मला हे कळवताना आनंद होत आहे की, गेल्या दोन दिवसांत युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि इराण या देशांमध्ये मध्यपूर्वेतील आपल्या संघर्षाच्या संपूर्ण आणि कायमस्वरूपी निराकरणाबाबत अतिशय सकारात्मक आणि फलदायी चर्चा झाली आहे.या सखोल, तपशीलवार आणि रचनात्मक चर्चेचा सूर आणि कल लक्षात घेता, ही चर्चा आठवडाभर सुरू राहणार आहे. मी संरक्षण विभागाला इराणच्या वीज



प्रकल्पांवर आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर होणारे कोणतेही आणि सर्व लष्करी हल्ले पाच दिवसांच्या कालावधीसाठी पुढे ढकलण्याचे निर्देश दिले आहेत. हा निर्णय सध्या सुरू असलेल्या बैठका आणि चर्चेच्या यशावर अवलंबून असेल. या विषयाकडे लक्ष दिल्याबद्दल धन्यवाद.” इराणने दिलेल्या कडक इशाऱ्यानंतर ट्रम्प यांची माघार. इस्लामिक रिपब्लिकने (इराण) असा इशारा दिला होता की, जर अमेरिकेने इराणच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर कोणताही हल्ला केला, तर इराण संपूर्ण प्रदेशातील ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य करेल. या इशाऱ्यानंतर ट्रम्प यांनी माघार घेतली आणि त्यांनी हा हल्ला पुढे ढकलण्याचे आदेश दिल्याचे जाहीर केले”, असे दूतावासांनी म्हटले आहे.

## युद्धामुळे भारतासमोर मोठी आव्हाने- पंतप्रधान

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

**संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सध्या सुरू असून, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियात निर्माण झालेल्या परिस्थितीवर महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया व्यक्त केली. लोकसभेत बोलताना त्यांनी इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील संघर्षाबाबत चिंता व्यक्त केली. तसेच, सर्व अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा भारतात सुरक्षित आणि अखंडितपणे सुरू राहील, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या संघर्षाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले. ते म्हणाले की, या परिस्थितीमुळे भारतासमोर अभूतपूर्व आव्हाने उभी राहिली आहेत. ही आव्हाने आर्थिक, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित तसेच मानवतावादी स्वरूपाची आहेत. कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचा मोठा पुरवठा मध्यपूर्वेतून होत असल्याने, या संघर्षाबाबत भारताची चिंता रास्त असल्याचे त्यांनी सांगितले.**

पंतप्रधानांनी स्पष्ट केले की, कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि खतांचा पुरवठा ‘स्ट्रेट ऑफ होर्मुझ’ मार्गे भारतात येतो. सध्याच्या परिस्थितीत या मार्गावरील सागरी वाहतूक आव्हानात्मक ठरत आहे. त्यामुळे पुरवठा

### ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवण्याचे आश्वासन



अखंडित राहावा यासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. देशातील नागरिकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, हा यामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. भारताच्या एकूण एलपीजी गरजेपैकी सुमारे ६० टक्के गरज आयातीद्वारे भागवली जाते. त्यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावर भर दिला जात आहे.

सरकार विविध देशांतील पुरवठादारांच्या संपर्कात असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. सध्या भारत ४१ देशांकडून ऊर्जेची आयात करतो. देशाकडे ५.३ दशलक्ष मेट्रिक टनांहून अधिक कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असून, ६.५ दशलक्ष मेट्रिक टन साठा उभारण्याचे काम सुरू आहे. तेल आणि वायूचा पुरवठा विविध स्रोतांमधून अखंड सुरू राहील, याची खात्री करण्यावर सरकारचे लक्ष आहे. आखाती प्रदेशासह पर्यायी पुरवठा मार्गांवरही बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, पश्चिम आशियातील बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी उच्चस्तरीय बैठक घेतली होती. सुमारे साडेतीन तास चाललेल्या या बैठकीत पेट्रोलियम, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, वीज आणि खतांच्या पुरवठ्याबाबत सविस्तर चर्चा झाली. या वेळी पंतप्रधानांनी स्पष्ट इशारा दिला की, देशात साठेबाजी आणि काळाबाजार अजिबात सहन केला जाणार नाही. तसेच संबंधित मंत्र्यांना पुरवठा, वितरण आणि लॉजिस्टिक्स व्यवस्था अधिक सक्षम ठेवून अत्यावश्यक वस्तूंचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले.

## गॅस सिलिंडरचे वजन कमी करण्याचा प्रस्ताव नाही

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

घरगुती गॅस सिलिंडरचे वजन १४.२ किलोवरून १० किलो केले जाणार असल्याची माहिती सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दरम्यान, केंद्र सरकारने यावर आता अधिकृत स्पष्टीकरण दिले आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी स्पष्ट केले की, "घरगुती एलपीजी सिलिंडरचे वजन कमी करण्याचा कोणताही प्रस्ताव सरकारसमोर नाही. नागरिकांनी अशा चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये. देशातील पेट्रोल पंपांवर इंधनाचा पुरेसा साठा असून पुरवठा सामान्यपणे सुरू आहे." मध्य पूर्वेतील युद्धामुळे गॅस पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. भारत आपल्या गरजेच्या सुमारे ६० टक्के एलपीजी आयात करतो. त्यामुळे भविष्यातील टंचाई टाळण्यासाठी सरकारने व्यावसायिक गॅस पुरवठ्यावर काही प्रमाणात नियंत्रण आणले असून, घरगुती ग्राहकांना गॅसचा तुटवडा भासू नये, यासाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे. मात्र, सरकारने घरगुती सिलिंडरच्या वजनात घट करण्याचा कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे नागरिकांनी अफवांना बळी पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

## “अशोक खरातला भेटलेल्यांची HIV चाचणी करावी लागेल, नाहीतर सगळेच मरतील”- विजय वडेट्टीवार

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्यभर चर्चेत असलेल्या भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणाचे तीव्र पडसाद आज विधानसभेत उमटले. ब्रह्मपुरीचे आमदार व काँग्रेस गटनेते विजय वडेट्टीवार यांनी “कॅप्टन खरातला भेटलेल्या सर्वांची एचआयव्ही चाचणी सरकारने करून घ्यावी,” अशी मागणी केली. “अन्यथा संसर्गजन्य आजार पसरून गंभीर परिणाम होऊ शकतात,” असा इशाराही त्यांनी दिला. वडेट्टीवार हे सभागृहात स्थगन प्रस्तावावर बोलत होते.

नाशिक येथील अशोक खरात या भोंदूबाबाशी संबंधित शंभरहून अधिक व्हिडिओ समोर आल्याचे वडेट्टीवार यांनी नमूद केले. “प्रगत आणि पुरोगामी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात अशा घटना घडणे चिंताजनक आहे,” असे ते म्हणाले. या प्रकरणात काही आयएएस, आयपीएस तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याचा आरोप त्यांनी केला. समोर आलेल्या व्हिडिओतील व्यक्तींच्या मोबाईल कॉल डिटेल रेकॉर्ड (CDR) ची चौकशी करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच, खरात ‘ओश्री जल’ तयार करून त्यात व्हायग्रा मिसळत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

या प्रकरणामुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलिन झाल्याचे वडेट्टीवार म्हणाले. प्रकरण उघडकीस आल्यानंतर खरातला वाचविण्यासाठी एका हॉटेलमध्ये तीन आयएएस अधिकारी प्रयत्न करत होते, असा गंभीर आरोप त्यांनी केला. काही आयपीएस अधिकाऱ्यांचाही यात सहभाग असल्याचे त्यांनी नमूद केले. केवळ एसआयटी चौकशी पुरेशी ठरणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वडेट्टीवार यांनी यावेळी महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावरही टीका केली. “महिलांच्या संरक्षणासाठी संविधानिक पदावर असलेल्या व्यक्ती अशा प्रवृत्तीचे समर्थन करतात का?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला. काही मंत्री देखील खरातच्या संपर्कात होते, असा आरोप त्यांनी केला.

भोंदूबाबाला साथ देणाऱ्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांचे राजीनामे घेऊन त्यांना सहआरोपी करण्यात यावे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. साकोलीचे काँग्रेस आमदार नाना पटोले यांनीही या प्रकरणावर नियम १०१ अंतर्गत चर्चा घेण्याची मागणी केली. “चाकणकर यांचा राजीनामा घेतला, मग इतरांचा का नाही?” असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. गुहागरचे आमदार भास्कर जाधव यांनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची मागणी केली.

## सातारा जिल्हा परिषद राडाप्रकरणी पोलीस अधीक्षकाचे निलंबन

- आरोपी प्रमाणे फरपटत नेले- आहे शंभूराजे देसाई
- अशी परिस्थिती यापूर्वी पाहिली नव्हती - एकनाथ शिंदे
- योग्य चौकशी करून कारवाई होईल- मुख्यमंत्री



**मुंबई, प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांच्या निवडणुकीदरम्यान घडलेल्या वादाची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. या निवडणूक प्रक्रियेदरम्यान पालकमंत्री शंभूराज देसाई यांना धक्काबुक्की झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सातारा जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत.

या सर्व घडामोडींविषयी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात सविस्तर माहिती देत घटनाक्रम मांडला आणि संबंधितांवर कारवाईची मागणी केली. दरम्यान, सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील वादाचे पडसाद विधानसभेतही उमटले. सातारा पोलिसांच्या निषेधार्थ विधानभवनाच्या पायऱ्यांवर शिंदे गटाच्या आमदारांनी आंदोलन करून घोषणाबाजी केली. त्यानंतर सभागृहात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे आश्वासन देत विषय थोडक्यात संपवला.

“साताऱ्यातील जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान घडलेल्या घटनेचा मी स्वतः साक्षीदार आहे. निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी मला दूरध्वनीवर संपर्क साधला होता. त्यावेळी मकरंद पाटील देखील तेथे उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, दोन मतदारांवर पाच वर्षांपूर्वीचा गुन्हा निवडणुकीच्या दोन दिवस आधी नोंदवण्यात आला आहे. त्यानंतर मी सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्याशी संपर्क साधून विचारणा केली. त्यांनी गुन्हा नोंद झाल्याचे सांगितले, मात्र त्यावर कारवाई नंतर करू असेही सांगितले. तेव्हा मी स्पष्टपणे सांगितले की, मतदानाच्या प्रक्रियेत कोणालाही वंचित ठेवता येणार नाही,” असे एकनाथ शिंदे म्हणाले.

“मतदानापासून कोणालाही वंचित ठेवू नका,” असे सांगितल्यानंतर पोलीस अधीक्षकांनी तसे काहीही होणार नाही, असे आश्वासन दिल्याचे शिंदे यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. “साताऱ्यातील निवडणुकीत काही अनियमितता होण्याची शक्यता आहे,” अशी शंका त्यांनी व्यक्त केली. त्यावर पोलीस महासंचालकांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. “कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानापासून रोखले जाणार नाही,” असे आश्वासन मिळाल्याचे शिंदे यांनी नमूद केले. तथापि, प्रत्यक्षात दोन मतदारांना ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप करत शिंदे म्हणाले, “निवडणूक पूर्ण झाल्यानंतर त्यांना सोडून काय उपयोग? अशा प्रकारे मतदानापासून वंचित ठेवणे हा लोकशाहीवर आघात आहे.” महाराष्ट्राच्या इतिहासात असा प्रकार प्रथमच घडल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, “उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल. चौकशीत जे निष्पन्न होईल, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.”

## रूपाली चाकणकरच मुख्य सूत्रधार

### अशोक खरात प्रकरणी रूपाली ठोंबरेंचा गंभीर आरोप

**पुणे, प्रतिनिधी**

भोंदू बाबा अशोक खरात याने ४००, ५००, ८०० कोटी रुपयांची मालमत्ता कोठून उभी केली, असा सवाल उपस्थित करत त्याच्या ट्रस्टला दिलेली अनेक बक्षीसपत्रे ही दबावाखाली दिली गेली आहेत की स्वेच्छेने, याची चौकशी व्हावी, अशी मागणी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली ठोंबरे यांनी केली. तसेच, त्याच्या कथित लैंगिक रॅकेटचा कारभार संविधानिक पदावर असलेल्या एका महिलेच्या आश्रयाखाली चालत होता, असा गंभीर आरोपही त्यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केला.

ट्रस्टमधील प्रत्येक व्यक्तीला आरोपी करून त्यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. कारण या प्रकरणात केवळ अशोक खरात एकटाच आरोपी नसून इतरांचाही सहभाग असण्याची शक्यता आहे, असा दावा त्यांनी केला.

एकनाथ शिंदे आमदारांना घेऊन गुवाहाटीला गेले होते. संजय राऊत यांनी हा विषय उपस्थित केला असल्याने त्याचीही चौकशी





व्हावी. माझ्या मते, गुवाहाटीला गेलेल्या आमदारांना अशोक खरातने मार्गदर्शन केले असावे. दीपक केसरकर यांच्यावरही कारवाई व्हावी. तसेच, अशोक खरातने तोंड उघडल्यास मंत्रिमंडळातील जवळपास पाच मंत्र्यांची नावे समोर येऊ शकतात, असा दावाही त्यांनी केला.

माझी खासदार आणि आमदारांना हात जोडून विनंती आहे की, आपल्या राजकीय मतभेदांमुळे हा विषय भरकटवू नये. अन्यथा महाराष्ट्रातील माताभगिनींवर झालेल्या अन्यायाचे सत्य समोर येणार नाही, असे आवाहनही रूपाली ठोंबरे यांनी केले.

“भोंदू बाबा अशोक खरातच्या लैंगिक रॅकेटमधील मुख्य आरोपींचे समर्थन करणाऱ्यांना माझे खुले आव्हान आहे—जर त्यांना गुन्हेगारांची बाजू घ्यायची असेल, तर त्यांनी प्रथम आपल्या घरातील महिलांना त्यांच्यासोबत कामाला पाठवण्याची तयारी दाखवावी; त्यानंतरच समाजाला उपदेश करावा. अनेक वर्षांपासून अशा प्रकरणांमध्ये जात किंवा धर्माचा आधार घेऊन गुन्हेगारांना वाचवण्याचे प्रयत्न होत आहेत. मात्र, या प्रकरणात सूत्रधार महिला असल्या तरी त्या महिलाच आहेत म्हणून त्यांच्या गुन्ह्यांना कायद्याने माफी मिळत नाही,” असेही रूपाली ठोंबरे यांनी स्पष्ट केले.

## 'सर्वाधिक काळ प्रमुख' म्हणून पद भूषवणारे पहिले नेते ठरले नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय राजकारणात एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. देशातील कोणत्याही निवडून आलेल्या सरकारचे 'सर्वाधिक काळ प्रमुख' म्हणून पद भूषवणारे ते पहिले नेते ठरले आहेत. सत्तेच्या सर्वोच्च पदावर आज त्यांचे ८,९३१ दिवस पूर्ण झाले आहेत.

या कामगिरीसह पंतप्रधान मोदींनी सिक्कीमचे माजी मुख्यमंत्री पवन कुमार चामलिंग यांचा सर्वाधिक काळ 'प्रमुख'पद भूषविण्याचा ( ८,९३० दिवस) विक्रम मोडीत काढला आहे. गुजरातचे मुख्यमंत्री आणि भारताचे पंतप्रधान असा दोन्ही कार्यकाळ मिळून मोदींनी हा टप्पा गाठला असून, आता त्यांनी सत्ताप्रमुख म्हणून आपल्या २५ व्या वर्षात पदार्पण केले आहे.

पंतप्रधान मोदींच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वपूर्ण विक्रमांची नोंद झाली आहे. यामध्ये ते गुजरातचे सर्वाधिक काळ सेवा देणारे मुख्यमंत्री आहेत. तसेच स्वतंत्र भारतात जन्मलेले देशाचे पहिले पंतप्रधान आहेत. तसेच २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग तीन लोकसभा निवडणुकांमध्ये विजय मिळवून त्यांनी आपले राजकीय वर्चस्व अबाधित ठेवले आहे.



नरेंद्र मोदी यांनी ७ ऑक्टोबर २००१ रोजी पहिल्यांदा गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळली होती. सलग १३ वर्षांहून अधिक काळ राज्याचे नेतृत्व केल्यानंतर, २१ मे २०१४ रोजी त्यांनी या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर २६ मे २०१४ रोजी त्यांनी भारताचे १४वे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. पूर्ण बहुमतासह सत्तेत येणारे ते पहिले बिगर-काँग्रेस नेते ठरले, तसेच दोन कार्यकाळ पूर्ण करून तिसऱ्यांदा सलग सत्तेत परतण्याचा मानही त्यांनी मिळवला आहे.

## सर्वाधिक पुरावे माझ्याकडे, विरोधकांनी राजकीय रंग देऊ नये- मुख्यमंत्री

**मुंबई, प्रतिनिधी**

भोंदूबाबा अशोक खरातला पोलिसांनी महिलेच्या लैंगिक शोषण प्रकरणात बुधवारी अटक केली. त्यानंतर आता त्याला २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. अशोक खरात त्याच्या कार्यालयात महिलांचं लैंगिक शोषण करायचा. त्यांचा लैंगिक छळही करायचा. पोलिसांना यासंदर्भातले ५८ व्हिडीओ मिळाले आहेत. दरम्यान या प्रकरणानंतर विरोधकांकडून विविध आरोप केले जात आहेत. अशोक खरात प्रकरण आणि विरोधकांचे आरोप याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

हवेत बोलणं, याला काही अर्थ नाही. अशोक खरात प्रकरण गंभीर आहे. आम्ही इंटेलिजन्सच्या आधारे भांडाफोड केला आहे. लाजेखातर किंवा सामाजिक दबावामुळे एकदम महिला पुढे येत नाहीत. त्या पीडितांना धीर देऊन आम्ही महिलांना समोर आणत आहोत. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर मॉनिटरिंग होतं आहे. नाशिक सीपी आणि एसआयटी मिळून हे काम पूर्ण करत आहेत. कुणालाच आम्ही सोडणार नाही. या प्रकरणाला जो राजकीय रंग देण्याचा प्रयत्न चालला आहे तो विनाकारण आहे. विरोधी पक्षातले कोण कोण जायचे खरातांकडे याचे पुरावे माझ्याकडे आहेत. सर्वाधिक पुरावे तर माझ्याकडे आहेत. पण ते पोलिसांकडे आहेत. पोलिसांचं काम पोलीस करत आहेत. खरातांना भेटणाऱ्यांपैकी कुणाचा सहभाग असेल तर त्यावर नक्की कारवाई होईल. पण कुणी भेटलं आहे अशा माणसावर कारवाई करायला लागलो तर मग तुम्हाला माहीत आहे कोण कोण कसं काय करायचं ते तुम्हाला म्हणजेच माध्यमांना माहीत आहे. या प्रकरणात राजकारण करु नये. हा महिलांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे.

आपल्या कथित शक्तींचा वापर करुन महिलांना भरीस पाडणं योग्य नाही. काही झालं तरीही शिक्षा होईलच. सरकार ही बाब सहन करणार नाही. कोण कोण भेटलं, फोटो आहेत ते कुणाचेही फोटो असू शकता. पण ज्यांनी मंत्रिमंडळांची बैठक बोलवून अशोक खरातच्या संस्थेला ४० किमीची लाइन टाकून पाणी अशोक खरातांना दिलं त्यांच्याबाबत कोण कोण गप्प आहे? मंत्र्यांबाबत बोलणारे याबाबत का गप्प बसलेत? सिलेक्टिव्ह का बोलत आहात? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना विचारला आहे. तसंच आम्हाला राजकारणात नाही तर महिलांच्या प्रतिष्ठेत इंटरेस्ट आहे. महिलांवर जे अन्याय झालेत त्यासंदर्भात आधी चौकशी होईल, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## अशोक खरातचा एन्काऊंटर होऊ शकतो- तृप्ती देसाई

**पुणे, प्रतिनिधी**

अशोक खरातला पोलिसांनी लैंगिक शोषण प्रकरणात अटक करण्यात आली आहे. त्यानंतर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणी कायदेशीर कारवाईचं आश्वासन दिलं आहे. तसंच सरकारसाठी महिलांची प्रतिष्ठा महत्त्वाची आहे असंही ते म्हणाले आहेत. दरम्यान तृप्ती देसाई यांनी अशोक खरातच्या एन्काऊंटरची भीती व्यक्त केली आहे.

आयजीच जर अशोक खरातला गुरु मानत आहेत तर ते गुरुवर कारवाई कशी करणार? त्यामुळेच हे प्रकरण मागच्या वर्षी उघड होऊ शकलं नाही. पोलिसांचा दबाव वाढला होता. आयजी दत्तात्रय कराळेंनी वारंवार पाठिशी घातलं त्यामुळे अशोक खरातची



हिंमत वाढत गेली आणि त्याने अनेक महिलांचं लैंगिक शोषण केलं. आयजी कराळे यांचीही चूक आहे असं सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाईंनी म्हटलं आहे.

अनेक बडे नेते अशोक खरातच्या संपर्कात होते, आर्थिक देवाण-घेवाण होत होती. आमदार, खासदार, आयएस अधिकारी वगैरे सगळ्यांचे संबंध होते. २४ तारखेला अशोक खरातची पोलीस कस्टडी संपणार आहे. त्यावेळी या नेत्यांची नावं पुढे येऊ नयेत म्हणून एकच मार्ग राहतो. तो म्हणजे अशोक खरातला संपवण्याचा. अशोक खरातचा एन्काऊंटर होऊ शकतो, त्यामुळेच मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आवाहन केलं आहे ही डाव त्यांनी उधळून लावा. हे रॅकेट उद्ध्वस्त करण्याची आवश्यकता आहे. जे कुणी अधिकारी, नेते आहेत त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई झाली पाहिजे अशीही माझी मागणी आहे. अशोक खरातला कायद्याने शिक्षा झाली पाहिजे असंही तृप्ती देसाईंनी म्हटलं आहे. प्रसार माध्यमांशी तृप्ती देसाईंनी संवाद साधला त्यावेळी त्यांनी ही अशोक खरातच्या एन्काऊंटरची भीती व्यक्त केली आहे.

## हर्षवर्धन सदगीर डबल महाराष्ट्र केसरी



**पुणे, प्रतिनिधी**

पुण्यात पार पडलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत नाशिकच्या हर्षवर्धन सदगीरने आपला दबदबा कायम राखत मानाची महाराष्ट्र केसरी चांदीची गदा पटकावली आहे. अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम लढतीत हर्षवर्धनने सोलापूरच्या महेंद्र गायकवाडचा ४-२ अशा गुणांनी पराभव केला. या विजयासह हर्षवर्धनने दुसऱ्यांदा ‘महाराष्ट्र केसरी’ होण्याचा बहुमान मिळवला असून, कुस्ती क्षेत्रात नाशिकच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पुण्यातील या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत संपूर्ण राज्याचे लक्ष या दोन तगड्या मल्लांच्या लढतीकडे लागले होते. मात्र, सुरुवातीपासूनच संयमी खेळ आणि आक्रमक पवित्र्याचा अचूक मेळ घालत हर्षवर्धनने महेंद्रवर वर्चस्व राखले.

तत्पूर्वी माती विभागाच्या अंतिम फेरीची लढत महेंद्र गायकवाड आणि सिकंदर शेख यांच्यात झाली. या लढतीमध्ये महेंद्रने सिकंदरचा ३-० ने पराभव करत महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या फायनलमध्ये धडक मारली. महेंद्र पहिल्या मिनिटात उघडले खाते उघडले होते. त्यानंतर आणखी एक गुण मिळवत महेंद्रने ३-० ने आघाडी घेत ती कायम ठेवली. दुसऱ्या राऊंडमध्ये सिकंदरने पूर्ण प्रयत्न केले पण त्याला काही विजय खेचता आला नाही.

गादी विभागाच्या कुस्तीमध्ये नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने जयराम पाटील याचा १०-० ने पराभव केला. भारंदाज डावावर त्याने गुणांचे खाते उघडले. शेवटपर्यंत जयरामला आघाडी मिळवून दिली नाही. आपल्या अनुभवाचा सदगीर याने फायदा घेतला. कुस्ती जिंकल्यावर हर्षवर्धन याने आपले गुरू काका पवार यांनी खांद्यावर घेतले.

**मुख्यमंत्र्यांची समारोप सोहळ्यात अनुपस्थिती**

महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्यात वाद सुरु असून आयोजन, मान्यता आणि व्यवस्थापन या मुद्द्यांवरून दोन्ही संघटनांमध्ये तीव्र मतभेद निर्माण झाले. त्याचा थेट परिणाम स्पर्धेच्या दर्जावर होताना दिसले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी समारोप सोहळ्याकडे पाठ फिरवल्याने अनेक तर्क वितर्कांना उधाण आले. फडणवीस उपस्थित राहणार होते,मात्र वादामुळे त्यांनी अंतर ठेवल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या प्रकरणाला राजकीय वळण लागल्याचे बोलले जात आहे.

## आर्यन खान अटक प्रकरण : “मी शाहरुख खानकडे लाच मागितली नाही, घेतलीही नाही!”

### समीर वानखेडे यांचा उच्च न्यायालयात दावा

**मुंबई, प्रतिनिधी**

आर्यन खान याची सुटका करण्यासाठी अभिनेता शाहरूख खान याच्याशी आपण कधीही संपर्क साधलेला नव्हता. तसेच लाचेची मागणी केली नाही आणि घेतलीही नाही, असा दावा केंद्रीय महसूल अधिकारी समीर वानखेडे यांच्यातर्फे सोमवारी उच्च न्यायालयात करण्यात आला.

साल २०२१ मधील कॉर्डिलिया क्रुझ प्रकरणी शाहरूख खानकडे लाच मागितल्याचा वानखेडे यांच्यावर आरोप आहे. याप्रकरणी सीबीआयने दाखल केलेला गुन्हा रद्द करण्याच्या मागणीसाठी वानखेडे यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन याचिका केली होती. न्यायालयानेही याचिकेची दखल घेऊन सीबीआयांच्या संथ तपासावर नाराजी व्यक्त केली होती. तसेच, तपास पूर्ण करण्यासाठी तुम्हाला अजून तुम्हाला किती दिवस लागतील ? असा प्रश्न केला होता.

मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे वानखेडे यांच्या याचिकेवर सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी, वानखेडे यांच्यातर्फे उपरोक्त दावा करण्यात आला. तथापि, सीबीआयचे वकील सुनावणीसाठी उपस्थित नसल्याने न्यायालयाने प्रकरणाची सुनावणी मंगळवारी ठेवली. हे प्रकरण बऱ्याच काळापासून प्रलंबित असल्याने ते फारकाळ प्रलंबित ठेवता येणार नाही, असेही न्यायालयाने प्रकरणाची सुनावणी तहकूब करताना स्पष्ट केले.

तत्पूर्वी, वानखेडे यांच्या वतीने युक्तिवाद करताना वरिष्ठ वकील आबाद पोंडा यांनी लाचेच्या आरोपांचे खंडन केले. केंद्रीय अमलीपदार्थ नियंत्रण विभागाच्या (एनसीबी) पश्चिम क्षेत्राच्या विभागीय संचालकपदी कार्यरत असाताना आपण बॉलीवूड आणि अमलीपदार्थ तस्करीचे एक रॅकेट उडकीस आणले होते. त्यावेळी अनेकांची चौकशी झाली होती. काहींकडे अमलीपदार्थही सापडले होते. त्याच काळात मुंबईहून गोव्याला जाणाऱ्या कॉर्डिलिया क्रुझवर टाकलेल्या छाप्यात आर्यन खान याला अटक करण्यात आली होती. त्याचमुळे आपल्याला खोट्या आरोपांत गोवण्यात आले होते.

आर्यनला वाचवण्यासाठी शाहरूख खानकडे आपण २५ कोटी रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आपल्यावर करण्यात आला. पुढे, तडजोड केली जाऊन ही रक्कम १८ कोटी रुपये ठरवण्यात आली. त्यातील ५० लाख रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारल्याचाही आरोप आपल्यावर आहे. परंतु, आपण शाहरूख खानशी कोणताही संपर्क साधलेला नाही. आपले नाव वापरून कोणी हे कृत्य केले असेल तर त्याला आपण जबाबदार नाही, असा दावा वानखेडे यांच्यावतीने करण्यात आला.

आपण निष्पक्ष आणि प्रामाणिकपणे तपास केला असून तपासादरम्यान आपल्यावर विविध कारणांनी दबाव टाकण्यात येत होता. आपल्याला एका राजकीय व्यक्तीकडून सतत लक्ष्य करण्यात आले. आतापर्यंतच्या कारकीर्दीत आपण कधीही चुकीचे वागलेलो नाही. आपल्यावरील सर्व आरोप निराधार असून आपण कोणत्याही चौकशीला समोर जायला तयार आहोत, असा दावा वानखेडे यांच्यातर्फे करण्यात आला.

आपल्या कुटुंबीयांवरही सतत आरोप केले गेले. आपली काही खासगी छायाचित्र प्रसिद्ध करण्यात आली. हे सारे आरोप हे पूर्णतः खोटे, दिशाभूल करणारे असून एनसीबीसारख्या स्वतंत्र तपास यंत्रणेची प्रतिमा मलीन करण्यासाठी केले असल्याचेही एनसीबीने त्यावेळी प्रतिज्ञापत्रात म्हटलं होते याकडे वानखेडे लक्ष वेधले.

अधिकाऱ्यांवर खंडणीचे आरोप करून या प्रकरणातील तपासात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. एनसीबीच्या सर्व अधिकाऱ्यांची सेवा निष्कलंक आहेत आणि प्रामाणिकपणे मुंबई अमली पदार्थमुक्त करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे देखील एनसीबीने त्यावेळी म्हटले होते , असे वानखेडे यांनी न्यायालयाला सांगितले.

# अंतर्मन शुद्ध करा, चराचरात भगवंत दिसेल !

## प.पू. अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजींच्या मंगलमय सानिध्यात 'गुढीपाडवा सत्संग सोहळा' संपन्न !

**मुंबई, प्रतिनिधी**

गुढीपाडव्याचे औचित्य साधून, अंधेरी-जोगेश्वरी विभाग गुरुभक्तांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'प्रतिवार्षिक सत्संग सोहळा' दि. 19 मार्च रोजी शिवाई मेंदान, पूनम नगर, अंधेरी (पूर्व) येथे अत्यंत उत्साहात पार पडला. या मंगलप्रसंगी प.पू. अद्दश्य काडसिद्धेश्वर स्वामीजींनी 'अंतःकरण शुद्धी आणि देवदर्शन' या विषयावर अमृतवाणीतून भाविकांना आत्मिक दर्शनाची प्रचिती दिली.

प्रवचनातील काही अमृतकण:

"ज्याप्रमाणे चंदनाला दगडावर उगाळल्याशिवाय त्याचा सुगंध दरवळत नाही, तसेच स्वतःला ईश्वरी कार्यात झिजवल्याशिवाय भक्तीचा सुगंध आयुष्यात येत नाही."

"तेल प्रत्येक बीमध्ये असते, पण ते मिळवण्यासाठी घाण्याचे घाव सोसावे लागतात; ईश्वरी साक्षात्कारही अशाच कठोर परिश्रमातून सिद्ध होतो."

"भक्ती म्हणजे केवळ ओढ नाही, तर ती दुधापासून तूप बनवण्यापर्यंतची एक संयमी आणि कष्टप्रद प्रक्रिया आहे; ज्यात तापणे आणि मंथन करणे अनिवार्य आहे."

"निसर्गाचा नियम आहे की 'तप' केल्याशिवाय 'फळ' मिळत नाही; मग ते झाडाचे मधुर फळ असो वा मानवी जीवनातील ईश्वरप्राप्तीचा आनंद असो."

"अंतर्मनाचे मंथन झाल्याशिवाय संशयाचे मळभ दूर होत नाही आणि जोपर्यंत संशय जिवंत आहे, तोपर्यंत परमेश्वराचा प्रकाश अनुभवास येत नाही."

"केवळ पोथीवाचनाने देव भेटत नाही; तर त्या ज्ञानावर श्रद्धेचे विरजण लावून कर्माच्या अग्नीवर स्वतःला तापावे लागते, तेव्हाच साक्षात्काराचे तूप हाती लागते."

"विजेचा बल्ब लहान असो वा मोठा, त्यातून वाहणारी विद्युतशक्ती एकच असते; तसेच ईश्वराचे ऐश्वर्य अफाट आणि मानवी शक्ती मर्यादित असली तरी दोघांमधील 'चैतन्य' एकच आहे."

"अध्यात्म म्हणजे जगाचा त्याग करून संन्यास घेणे नव्हे, तर संसारात आपली कर्तव्ये पार पाडताना 'मी ईश्वराचा अंश आहे' या अखंड जाणिवेत जगणे होय."

"जेव्हा 'मी' आणि 'तो' यातील भेदाची भिंत गळून पडते, तेव्हा उरतो तो केवळ अथांग आनंद, चिरंतन शांती आणि 'अहं ब्रह्मास्मि'चा अद्वैत अनुभव!"

"समुद्राची लाट आणि अथांग समुद्र दिसायला भिन्न असले तरी दोघांमध्ये 'पाणी' हेच समान तत्त्व आहे; तसेच जीवात्मा आणि परमात्मा यांच्यात 'चैतन्य' एकच आहे."

"बाह्य सृष्टीचा अभ्यास करणारा शास्त्रज्ञ निसर्ग जाणतो, पण खरा आध्यात्मिक पुरुष तोच जो स्वतःच्या अंतर्यामी असलेल्या 'चिदात्म्याचा' शोध घेतो."

"हे विश्व म्हणजे त्या एकाच परमात्म्याचा अनंत विलास आहे; ज्याप्रमाणे मातीची भांडी अनेक असली तरी त्यातील मूळ तत्त्व 'माती' एकच असते, तसेच सर्व जीवांमध्ये रूंजी घालणारे 'चैतन्य' एकच आहे."

"शरीर म्हणजे केवळ पाण्याने भरलेले पात्र आहे आणि त्यातील जीवात्मा म्हणजे आकाशातील एकाच सूर्याचे उमटलेले प्रतिबिंब; पात्र फुटले तरी मूळ सूर्याचे अस्तित्व कधीही संपत नाही."

"जोपर्यंत 'मी शरीर आहे' हा देहाभिमानाचा पडदा डोळ्यांसमोर आहे, तोपर्यंत समोर असलेला परमात्माही दिसत नाही; ज्या क्षणी हा भ्रम विरघळतो, त्या क्षणी 'मीच तो आहे' हा साक्षात्कार घडतो."

"सद्गुरूंच्या मार्गदर्शनाखाली जेव्हा श्रवण आणि मनन परिपक्व होते, तेव्हा साधकाला केवळ शाब्दिक ज्ञान मिळत नाही, तर 'मी परमात्माच आहे' हा अनुभवजन्य निश्चय त्याच्या संपूर्ण जीवनाचे सार्थक करतो."

"काम, क्रोध, लोभ यांसारखे शत्रू जोपर्यंत अंतःकरणात ठाण मांडून आहेत, तोपर्यंत साक्षात देव समोर असूनही तो आपल्याला दिसत नाही; कारण आपली दृष्टी देवाच्या रूपापेक्षा विषयांच्या 'चपलां'मध्येच जास्त अडकलेली असते."

"मूर्ती हे केवळ एक माध्यम आहे, पण त्यामागची 'अमूर्त' शक्ती ओळखणे हीच खरी साधना आहे; ज्या दिवशी आकारात निराकार तत्त्व दिसायला लागेल, त्या दिवशी मंदिरातला देव आणि बाहेरचा जीव यातील भेद कायमचा मिटून जाईल."

"गुढीपाडवा हा केवळ कॅलेंडर बदलण्याचा दिवस नसून तो ब्रह्मांडाच्या निर्मितीचा 'युगादी' क्षण आहे. ऋषीमुनींनी दिलेली कालगाणना आधुनिक विज्ञानालाही थक्क करणारी आहे."



"लगाम नसलेला घोडा ज्याप्रमाणे स्वाराला खड्ड्यात पाडतो, तसेच अनियंत्रित मन मानवाचे अध:पतन करते; मनावर ताबा मिळवणे हीच खरी 'शक्ती' आणि जीवनाची पहिली 'साधना' आहे."

"आहार, निद्रा आणि भय तर पशूंमध्येही असते; जर मानवी जन्मही केवळ उदरभरणात घालवला, तर आपल्यात आणि पशूंमध्ये काय अंतर उरेल? खऱ्या समाधानाचा शोध हाच मानवी जन्माचा खरा उद्देश आहे."

"सहनशीलता आणि उदासीनता ही सुखी जीवनाची दोन महासूत्रे आहेत; 'जाऊ द्या' म्हणण्याची वृत्ती (उदासीनता) आणि न टाळता येणारे प्रसंग सोसण्याचे बळ (सहनशीलता) ज्याच्याकडे आहे, त्याचे अर्धे आयुष्य तर तिथेच सुसह्य होते."

"श्रद्धा, समाधान, निग्रह, संयम, उदासीनता, क्षमा आणि शांती या सात गुणांचा 'दैनिक संस्कार' म्हणून स्वीकार करा. मन मधुर करा, दृष्टी स्वच्छ करा; मग भगवंत तुमच्या हृदयातच प्रकट होईल! "

सोहळ्याची काही खास वैशिष्ट्ये:

सामाजिक कृतज्ञता: सोहळ्यात ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला आणि नुकत्याच पदवीधर झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्वामीजींच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

भक्तीचा मळा: प्रतिवार्षिक संगीत भजनाच्या कार्यक्रमाने वातावरण भक्तिमय झाले होते.

शिस्तबद्ध नियोजन: हजारो भाविकांची उपस्थिती - कार्यकर्त्यांच्या परिश्रमामुळे अत्यंत शिस्तबद्धरीतीने सोहळा उत्साहात संपन्न झाला. गुरुबंधू श्री. बाळकृष्ण विचारे यांच्या निवेदनामुळे कार्यक्रमातील प्रत्येक टप्पा भाविकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला.

डिजिटल दर्शन: हा संपूर्ण सोहळा 'Siddhagiri Math Official' युट्यूब चॅनेलवर भाविकांसाठी थेट प्रक्षेपित (Live) करण्यात आला होता.

श्री. काडासिद्धेश्वर गुरुभक्त मंडळ जोगेश्वरी अंधेरी विभागाच्या वतीने करण्यात आलेले नियोजन आणि महाप्रसादाची व्यवस्था सुव्यवस्थित होती. अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्धतेत हा सत्संग कार्यक्रम संपन्न झाला. स्वामीजींच्या अमृत वाणी आणि दर्शनाचा हजारो भाविकांना लाभ घेतला

# अभिजीत राणे यांची भाजपा कामगार आघाडीचे मुंबई अध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई, प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या (भाजपा) मुंबई प्रदेश कामगार आघाडीमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडला असून, विख्यात कामगार नेते अभिजीत राणे यांची मुंबई अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती मार्च २०२६ मध्ये झाली असून, कामगारांच्या हक्कांसाठी सातत्याने लढणाऱ्या अभिजीत राणे यांच्या कार्याचा गौरव म्हणून ही जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. अभिजीत राणे हे 'धडक कामगार युनियन'चे संस्थापक महासचिव असून, लाखो कामगारांच्या संघटनेचे नेतृत्व करतात. त्यांच्या या नव्या भूमिकेमुळे मुंबईतील कामगार वर्गाला अधिक मजबूत आवाज मिळण्याची अपेक्षा आहे.

अभिजीत राणे यांचा जन्म ८ नोव्हेंबर १९८२ रोजी मुंबईत झाला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आचिरणे हे त्यांचे मूळ गाव. लहानपणापासूनच सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे राणे यांनी १३-१४ व्या वर्षीच सार्वजनिक जीवनात येण्याचा निर्णय घेतला. ते धडक कामगार युनियनचे संस्थापक असून, ७ लाखांहून अधिक ब्लू-कॉलर कामगारांना ३०० हून अधिक प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये संघटित केले आहे. याशिवाय अभिजीत राणे यूथ फाउंडेशन, द ग्रेट मराठा एज्युकेशनल ट्रस्ट आणि अखिल भारतीय मराठा महासंघ यांसारख्या संस्थांमार्फत युवा आणि शिक्षण क्षेत्रातही त्यांचे योगदान आहे.



भाजपा कामगार आघाडीच्या मुंबई अध्यक्षपदी नियुक्तीनंतर अभिजीत राणे यांनी पक्षाच्या मुंबई प्रदेश नेत्यांची भेट घेतली. भाजपा मुंबई उपाध्यक्ष पंकज यादव यांनी त्यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच विलेपार्ले आमदार पराग अळवणी, मुंबई सचिव आचार्य पवन त्रिपाठी यांच्या उपस्थितीत नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती आणि मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. भाजपा मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्यक्रम यशस्वी झाले. माजी आमदार भारती लवेकर यांनीही अभिजीत राणे यांची सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.

अभिजीत राणे हे मराठी पत्रकारितेतही सक्रिय आहेत. ते 'मुंबई मित्र' सारख्या माध्यमांचे ग्रुप एडिटर असून, कामगारांच्या समस्या आणि राजकीय मुद्द्यांवर नियमित लेखन करतात. त्यांच्या 'From the Desk of Abhijeet Rane' या सदरातून ते विविध विषयांवर मत व्यक्त करतात. कामगारांच्या हक्क, रोजगार, सुरक्षा, वेतन आणि सामाजिक न्याय यांसारख्या मुद्द्यांवर ते आक्रमक भूमिका घेतात. धडक कामगार युनियनमार्फत त्यांनी हजारो कामगारांच्या समस्या सोडवल्या आहेत. विविध मेळावे, स्नेहसंमेलने आणि आंदोलनांद्वारे कामगार वर्गाला एकत्र आणले आहे.

ही नियुक्ती कामगार सेनेला नवे बळ देणारी ठरेल, अशी अपेक्षा आहे. मुंबईसारख्या महानगरात असंख्य कामगारांचे प्रश्न प्रलंबित आहेत. अनियमित कामगार, सुरक्षा रक्षक, औद्योगिक कामगार, हॉटेल वाहतूक क्षेत्रातील कर्मचारी यांच्या समस्या सोडवण्यासाठी अभिजीत राणे यांचे अनुभव आणि संघटन कौशल्य उपयुक्त ठरेल. भाजपाच्या कामगार आघाडीला मुंबईत अधिक प्रभावी बनवण्यासाठी ते प्रयत्न करतील, असे मानले जाते.

अभिजीत राणे यांनी या नियुक्तीवर प्रतिक्रिया देताना सांगितले की, "कामगार हा राष्ट्राचा कणा आहे. त्यांच्या प्रगतीशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही. भाजपा कामगार आघाडीच्या माध्यमातून मी कामगारांच्या हक्कांसाठी अधिक ताकदीनं लढेन." ही नियुक्ती कामगार नेत्यांच्या राजकीय वाटचालीत एक नवे पर्व सुरू करणारी आहे. मुंबईतील कामगार वर्गासाठी ही खूप मोठी संधी आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### ज्येष्ठ लेखिका माधवी कुंटे यांचे निधन

**मुंबई, प्रतिनिधी**

ज्येष्ठ लेखिका माधवी कुंटे यांचे शनिवारी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्या ८१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चता दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी अंधेरीतील पारशी वाडा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. २२ वर्षे अध्यापन क्षेत्रात कार्यरत असताना माधवी कुंटे यांनी आपली लेखनाची आवडही जोपासली. कांदबरी, कथा, कविता आणि ललित लेखनात त्यांनी मुशाफिरी केली, परंतु अनुवादातही त्यांचा हातखंडा होता. त्यामुळेच त्यांनी आचार्य रजनीश उर्फ ओशो यांच्या अध्यात्म आणि तत्त्वज्ञानपर साहित्याबरोबरच वेद राही या हिंदीतील दिग्गज साहित्यिकांच्या साहित्याचाही मराठीत रसाळ अनुवाद केला. यात प्रामुख्याने ओशो विचार दर्शन, ओशो विचार मंथन, ओशो विचार दर्पण, भक्ती सुंगध आणि भक्ती ऋण ही पुस्तके त्यांनी मराठीत अनुवादित केली. अंधारे भुयार ही कांदबरी, क्रॉस फायरिंग ही दीर्घ कथा, अधुरी एक कहाणी, अनंत या कथासंग्रहाचा लयदय्द ही चरित्रात्मक कांदबरी या वेद राही यांच्या साहित्याचा अनुवाद कुंटे यांनी केला होता. रूपेरी परिच्या कथा, किलबिल, गंमत जंमत, जंगलचा राजा आणि इतर कथा, शूरवीर सायट्ट आणि इतर कथा यांसह बालसाहित्यात त्यांनी विपुल लेखन केले आहे.

### मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उपपरिसरात 'अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर' होणार

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उपपरिसराची निवड भारत सरकारच्या नीती आयोग अंतर्गत कार्यरत अटल इनोव्हेशन मिशन यांच्या 'अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर' योजनेसाठी करण्यात आली असून, नुकतेच या प्रकल्पासाठी २.५ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. रत्नागिरी उपपरिसरात सुमारे ४ हजार चौरस फूट जागेत अत्याधुनिक 'फॅब लॅब 'सह इन्क्युबेशन सुविधा उभारण्यात येणार आहेत. स्टार्टअप्ससाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रोटोटायपिंग, तसेच निधी उपलब्ध करून देण्यासाठी एकात्मिक परिसंस्था निर्माण केली जाणार आहे. मुंबईतील तज्ज्ञ व उद्योग क्षेत्राशी थेट जोडणीही साधली जाणार आहे. १८० किमीपेक्षा अधिक किनारपट्टी असलेला रत्नागिरी जिल्हा 'ब्ल्यू इकॉनॉमी' साठी मोठी क्षमता बाळगत असून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना उद्योजकतेकडे वळविण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. टियर-३ शहरात हा उपक्रम राबविणे म्हणजे शहरी-ग्रामीण नवोपक्रम दरी कमी करण्याच्या केंद्र सरकारच्या उद्दिष्टाला चालना देणारे पाऊल ठरणार आहे. हा प्रकल्प केवळ विद्यार्थ्यांसाठी मर्यादित नसून समाजातील विविध घटकांना लाभ देणारा आहे. शेतकऱ्यांसाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञान, महिला बचत गटांसाठी ब्रँडिंग व मार्केटिंग सहाय्य, तसेच युवकांसाठी थ्री-डी प्रिंटर, लेझर कटर, सीएनसी यंत्रसामग्रीसारख्या अत्याधुनिक साधनांचा वापर उपलब्ध होणार आहे.

### आशा, अंगणवाडी, गटप्रवर्तकांना कायम आरोग्य कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या

**मुंबई, प्रतिनिधी**

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महिलांसह अंगणवाडी कर्मचारी यांना कायम आरोग्य कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या, अशी मागणी महाराष्ट्र आशा गटप्रवर्तक व आरोग्य कर्मचारी संघटनेने राज्य सरकारकडे केली आहे. याबाबत संघटनेच्या जनरल सेक्रेटरी सुमन पुजारी म्हणाल्या, सर्वोच्च न्यायालयाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर उपदान ग्रॅज्युटी देण्याचे आदेश दिले आहेत. इतकेच नव्हे तर अंगणवाडी व इतर योजनाकर्मी हे स्वयंसेवक नसून सरकारी कर्मचारी आहेत, असा महत्त्वपूर्ण निकाल २५ जून २०२२ ला दिला आहे. परंतु; अद्याप या निकालाची अंमलबजावणी केंद्रसरकार करीत नाही. गुजरातच्या मणिबेन भारीया यांनी दाखल केलेल्या केसच्या या निकालपत्रामध्ये असेही नमूद केलेले आहे की, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दिले जाणारे मानधन हा पगाराचा भाग आहे. त्यामध्ये आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महिलांचाही समावेश होतो म्हणून आशा व गटप्रवर्तक यांना मिळणारे नियमित मानधन हे मानधन नसून तो पगाराचा भाग आहे, असेही पुजारी यांनी सांगितले.

### कंत्राटी वीज कामगारांच्या प्रश्नासंदर्भात कामगार आयुक्त कार्यालयात बैठक

**मुंबई, प्रतिनिधी**

कंत्राटी वीज कामगारांच्या प्रश्नासंदर्भात मुंबई येथील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्समधील राज्य कामगार आयुक्त कार्यालयात शुक्रवारी (दि. २७) बैठक होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष निलेश खरात यांनी दिली. महावितरणने राज्यातील ३२९ उपकेंद्रामध्ये एकूण १३१६ वीज कंत्राटी कामगार सबस्टेशन ऑपरेटर (यंत्रचालक) या जोखमीच्या पदावर क्रिस्टल व स्मार्ट सर्व्हिसेस या राजकीय वरदहस्त असलेल्या एजन्सीला निविदा दिली आहे. त्यांनी अनेक कामगारांना वेळेवर पगार दिले नाही. अनेकांचे भविष्य निर्वाह निधी व कामगार राज्य विमा योजनेचे (इएसआयसी) पैसे शासन दरबारी भरलेले नाहीत. त्यामुळे हजारो वीज कंत्राटी कामगारांना याचा त्रास होत आहे, असे खरात यांनी सांगितले.

# सोसायटी अचिव्हर्सच्या कव्हर पेजवर मंत्री पंकजा मुंडे




**मुंबई, प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या प्रभावी नेतृत्वाची दखल घेत सुप्रसिद्ध इंग्रजी मासिक 'सोसायटी अचिव्हर्स' यांनी त्यांच्या विशेष मुलाखतीसह त्यांना कव्हर पेजवर स्थान दिले आहे. "देअर इज नो सबस्टिट्यूट फॉर इथिकल लीडरशीप" या शब्दांत त्यांच्या राजकीय व सामाजिक प्रवासाचा गौरव करण्यात आला आहे.

मॅगझिनची स्पेशल एडिशन यंदा प्रकाशित झाली असून देश-विदेशातील मोठ्या वाचकवर्गात ती पोहोचली आहे. अभ्यासू, धडाडीच्या आणि लोकाभिमुख निर्णय घेणाऱ्या नेत्या म्हणून मंत्री पंकजा मुंडे यांनी राज्याच्या राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. पर्यावरण, वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन या विभागांत मंत्री म्हणून काम करताना त्यांनी घेतलेल्या पुढाकारांचा आढावा या मुलाखतीत मांडण्यात आला आहे.

मॅगझिनच्या संपादिका अँड्रिया कोस्टबीर यांनी ही विशेष मुलाखत घेतली असून मंत्री पंकजा मुंडे यांच्या कार्यप्रवासातील विविध टप्पे व पैलू आकर्षक छायाचित्रांसह सादर करण्यात आले आहेत. विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांच्या मुलाखतीही या अंकात समाविष्ट आहेत.

शनिवारी संपादिका अँड्रिया कोस्टबीर आणि अशोक धामणकर यांनी रामटेक येथील शासकीय निवासस्थानी भेट देऊन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते या स्पेशल एडिशनचे प्रकाशन केले. यानंतर माध्यमांशी बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, "सोसायटी अचिव्हर्स मॅगझिनने त्यांच्या कव्हर स्टोरीमध्ये मला स्थान दिल्याबद्दल मी संपूर्ण टीमचे मनापासून आभार मानते. माझ्या प्रवासाची झलक या अंकातून वाचकांसमोर येत आहे, ती नक्की वाचा," असे आवाहन त्यांनी केले.

# देवनार कत्तलखाना आधुनिकीकरणासाठी ९८० कोटींच्या निविदेला केवळ एकच बोली

**मुंबई, प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिकेला देवनार कत्तलखाना संकुलाच्या आधुनिकीकरणासाठी ऑक्टोबरमध्ये काढलेल्या सुमारे ९८० कोटी रुपयांच्या टर्नकी प्रकल्पासाठी अनेक मुदतवाढीनंतरही फक्त एकच बोली प्राप्त झाली आहे. तसेच सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर प्रजाती-निहाय कत्तलखाने उभारण्यासाठी २५० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या चार स्वतंत्र प्रस्तावांपैकी केवळ दोनच प्रस्ताव मिळाले आहेत.

महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले की, निविदा छाननी समिती या एकमेव बोलीवर पुढे जाण्याचा निर्णय घेणार असून RFP संदर्भातही अंतिम निर्णय घेतला जाईल. "मिळालेल्या दोन प्रस्तावांपैकी एक म्हशींसाठी आणि दुसरा मेंढ्या/शेळ्यांसाठी आहे. टर्नकी प्रकल्पाच्या तांत्रिक बोलीचे निकष तपासले जात आहेत. संबंधित कंपनीला प्रकल्प कसा राबवणार याचे सादरीकरण करण्यास सांगितले जाईल. त्यानंतर आर्थिक बोली उघडण्याबाबत निर्णय घेतला जाईल. नियमांनुसार तीनपेक्षा अधिक वेळा मुदतवाढ दिली असल्याने एकच बोली असली तरी प्रकल्प पुढे नेता येऊ शकतो," असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

या प्रकल्पाचा उद्देश सध्याच्या अर्ध-यांत्रिक व्यवस्थेला जागतिक दर्जाच्या, स्वच्छ आणि अत्याधुनिक सुविधांमध्ये रूपांतरित करणे हा आहे. यामध्ये प्राण्यांवर मानवीय पद्धतीने प्रक्रिया करण्यासाठी ऑटोमेटेड इलेक्ट्रिकल स्टनर्स, कॅप्टिव बोल्ट किंवा इलेक्ट्रिकल पद्धतीने गट स्टनिंग पेन, तसेच कार्बन डायऑक्साइडद्वारे बेशुद्ध करण्याची तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे.

टर्नकी प्रकल्पांतर्गत एकच कंत्राटदार डिझाईनपासून अंतिम हस्तांतरणापर्यंत सर्व टप्प्यांची जबाबदारी सांभाळतो. यामध्ये म्हैस, शेळी व मेंढ्यांसाठी लॅरेज सुविधा, प्रशासकीय इमारत, कौशल्य विकास केंद्र, बायो-मेथनायझेशन आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणीचा समावेश आहे.

आरएफपी अंतर्गत सहाय्यक सुविधा उभारण्याचा समावेश असून त्यात म्हैस, शेळी/मेंढी, डुक्कर आणि कुक्कुट पक्ष्यांसाठी स्वतंत्र कत्तल युनिट्स उभारण्यात येणार आहेत. या युनिट्सची क्षमता दररोज सुमारे १,१०० म्हशी, १०,००० शेळ्या/मेंढ्या, ५०० डुक्कर आणि ४०,००० कोंबड्यांची असेल. PPP भागीदार सर्व भांडवली खर्च उचलणार असून महापालिकेने ठरवलेल्या दरांनुसार सेवा देईल आणि एकूण उत्पन्नातील ठराविक हिस्सा महापालिकेसोबत वाटून घेईल.

# माहीम बीचवरील दिवे बंद, सार्वजनिक सुरक्षेला धोका

**मुंबई, प्रतिनिधी**

माहीम बीच परिसरातील अनेक रस्त्यावरील दिवे बंद अवस्थेत असल्याने सूर्यास्तानंतर मोठा भाग अंधारात जात आहे, अशी माहिती स्थानिक कार्यकर्त्यांनी दिली. माहीममधील सामाजिक कार्यकर्ते सय्यद एम. इस्माईल यांनी बेस्ट वीज विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहीमच्या रेती बंदर बीचवरील रस्ते दिवे तात्काळ दुरुस्त करून वाढवण्याची मागणी केली आहे. अपुऱ्या प्रकाशामुळे सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होत असल्याचा इशाराही त्यांनी दिला. सरकारी अधिकाऱ्यांकडून याबाबत कोणतीही



प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, योग्य प्रकाशव्यवस्था नसल्यामुळे स्थानिक नागरिक, पर्यटक आणि कुटुंबीयांसाठी, विशेषतः संध्याकाळच्या वेळी, असुरक्षित वातावरण निर्माण झाले आहे. पुरेशा प्रकाशाच्या अभावामुळे अपघात किंवा गुन्हेगारी घटनांची शक्यता वाढते.

त्यांनी हेही नमूद केले की, सध्याची प्रकाशयोजना अपुरी असून बीच परिसरात केवळ मोजकेच दिवे कार्यरत आहेत. बंद पडलेले दिवे दुरुस्त करण्याबरोबरच रेती बंदर बीचच्या आतील भागात अधिक रस्ते दिव्यांचे खांब उभारण्याची मागणी इस्माईल यांनी केली आहे.

# बोरिवलीतील केअर होममध्ये ७५ वर्षीय महिलेचे हात बांधून मारहाण; गुन्हा दाखल

**मुंबई, प्रतिनिधी**

बोरिवली पश्चिम येथील साई सीनियर केअर फाउंडेशनमध्ये काम करणाऱ्या ३० वर्षीय केअरटेकरने ७५ वर्षीय महिलेचे हात पलंगाला बांधून तिच्यावर शारीरिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना ११ मार्च रोजी घडल्याचे पोलिसांनी सांगितले. सुरेखा पवार (रा. पालघर) असे आरोपी केअरटेकरचे नाव असून, तिने पीडित महिलेला धमकावून ही घटना कुणालाही सांगितल्यास पुन्हा मारहाण करण्याची धमकी दिली होती. एफआयआरनुसार, तक्रारदार विशाली अजवेलकर या निवृत्त असून त्यांच्या पतीचे २६ वर्षांपूर्वी निधन झाले आहे. त्यांना तीन मुले असून त्यात एक मुलगी आहे. त्या मागील सहा महिन्यांपासून या केअर होममध्ये राहत आहेत.

११ मार्च रोजी दुपारी ४ ते ५ दरम्यान अजवेलकर यांना वारंवार लघवीला जाण्याची गरज भासत होती आणि त्या अनेक वेळा शौचालयात गेल्या. मात्र, पवार यांनी त्यांना मदत करण्यास नकार दिल्याचे सांगितले जाते. तक्रारीनुसार, अजवेलकर झोपेत असताना पवार यांनी त्यांच्या हातांना पलंगाला बांधले आणि नंतर झाडूने मारहाण केली. या घटनेनंतर पवार यांनी पीडितेला धमकी दिली. भीतीपोटी अजवेलकर यांनी ही बाब कुणालाही सांगितली नाही. २० मार्च रोजी काही महिला व पुरुषांचा गट, महिला पोलिस अधिकाऱ्यासोबत केअर होममध्ये आला. त्यांनी अजवेलकर यांना विश्वासात घेऊन त्यांच्या प्रकृतीबाबत विचारपूस केली. त्यानंतर अजवेलकर यांनी आपल्यावर झालेल्या अत्याचाराची माहिती दिली आणि बोरिवली पोलिसांकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ११८(१) तसेच इतर संबंधित कलमांखाली पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मारहाणीमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. पवार यांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन कायदेशीर प्रक्रियेनुसार नोटीस देण्यात आली आहे.

# मुंबईत ३९ हजारांहून अधिक बेकायदा नळ कनेक्शन

**मुंबई, प्रतिनिधी**

शहरवासीयांची रोजची तहान भागविण्यासाठी १२० किमी अंतरावरुन मुंबईत पिण्याचे पाणी दिले जाते. स्वच्छ व शुद्ध पाणी उपलब्ध होत असताना ही मुंबईत बेकायदा नळ कनेक्शन घेत पाणी चोरी होत असल्याची माहिती समोर आली आहे. २०१७ ते २०२५ पर्यंत ३१६८३ बेकायदा नळ कनेक्शन असल्याची माहिती पालिकेच्या आकडेवारीतून समोर आली आहे.

बेकायदा नळ कनेक्शन द्वारे पाणी चोरी होत असल्याचे निदर्शनास येताच पालिकेच्या जल विभागाने ३० हजार ३०२ नळ कनेक्शन कट केले आहेत. नळ जोडणी अधिकृत असल्याची कागदपत्रे सादर केल्यानंतर १,३८१ नळ कनेक्शन अधिकृत करण्यात आले आहेत. दरम्यान, दादर, माहिम, धारावी भागात पाणी चोरी होत असल्याचे उघडकीस आले आहे.

पाणी हा प्रत्येकाचा अधिकार असून मागेल त्याला पाणी द्या, असे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. त्यामुळे उत्तुंग इमारती असो झोपडपट्टी सर्वांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी जून २०२२ मध्ये सर्वांना पाणी हे धोरण अंमलात आणले. मात्र या धोरणाला बगल देत झोपडीधारक, दुकानदार, हॉटेल, कारखाने, गोदाम मालक अनधिकृतपणे नळजोडणी करून पाणीचोरी करत असल्याचे निदर्शनास आले. जानेवारी २०१७ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण ३१६८३ अनधिकृत नळ जोडण्या असल्याचे निदर्शनास आले. २०१७ मध्ये ३३०२ अनधिकृत नळजोडण्या करण्यात आल्या होत्या. २०२५ मध्ये ३३१६ अनधिकृत नळजोडण्यात आढळल्या आहेत. २०२४ च्या तुलनेत यात काहीशी वाढ आहे.

२०२४ मध्ये ३१५० अनधिकृत नळजोडण्या करण्यात आल्या होत्या. दादर, माहिम, धारावी या 'जी' उत्तर वॉर्डमध्ये, एम पश्चिम वॉर्ड या चेंबूर भागात, एम पूर्व वॉर्ड असलेल्या मानखुर्द, अणुशक्ती नगर, एल वॉर्डमधील कुर्ला, साकिनाका, चांदिवली, एन वॉर्ड असलेल्या घाटकोपर, टी वॉर्ड असलेल्या मुलुंड, पी उत्तर या मालाड, एच पूर्व वॉर्ड असलेल्या वांद्रे, खार पूर्व, के पूर्व वॉर्ड असलेल्या अंधेरी आणि जोगेश्वरी पूर्व आदी भागात सर्वाधिक बेकायदा नळ कनेक्शन असल्याचे निदर्शनास आल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# 'आपला दवाखाना'वर आता जनतेचा पहारा; सरकारचा मोठा निर्णय!

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्यातील 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' केंद्रांच्या कारभाराबाबत गेल्या काही दिवसांपासून नागरिकांच्या तक्रारी वाढत होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत राज्य सरकारने आता दवाखान्यांच्या व्यवस्थापनात थेट सर्वसामान्यांचा हस्तक्षेप वाढवण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. यापुढे प्रत्येक दवाखान्यावर 'जन आरोग्य समिती' स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले असून, यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय शुक्रवारी जाहीर करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे आता दवाखान्यातील केवळ डॉक्टर किंवा कर्मचारीच नव्हे, तर स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी आणि स्वयंसेवकही आरोग्य व्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवणार आहेत. विशेष म्हणजे, पारदर्शकता आणि महिलांच्या सहभागावर भर देण्यासाठी या समित्यांमध्ये ५० टक्के आरक्षण महिलांसाठी ठेवण्यात आले आहे. दवाखान्यातील स्वच्छता, औषधांचा नियमित पुरवठा, पिण्याच्या पाण्याची सोय आणि रुग्णांना मिळणारी वागणूक या सर्व बाबींवर ही समिती थेट नियंत्रण ठेवणार आहे.

केवळ देखरेखच नाही, तर या समित्यांना आर्थिक अधिकारही बहाल करण्यात आले आहेत. प्रत्येक दवाखान्यासाठी दरवर्षी सुमारे १ लाख रुपयांचा 'अनटाईड फंड' (स्वतंत्र निधी) उपलब्ध करून दिला जाणार आहे. औषधांची कमतरता भासल्यास किंवा तातडीच्या दुरुस्तीसाठी या निधीचा वापर करण्याचा अधिकार समितीला असेल. मात्र, हा खर्च केवळ सार्वजनिक आरोग्य सेवांसाठीच करावा लागेल, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

समितीच्या नियमित बैठका आणि खर्चाचा सविस्तर तपशील सादर करणे अनिवार्य केल्यामुळे, आता 'आपला दवाखाना' अधिक लोकाभिमुख आणि उत्तरदायी होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. सरकारच्या या 'जन पहेऱ्या'मुळे आरोग्य सेवेचा दर्जा खरोखर सुधारणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विधान परिषदेचा 'नऊ'चा आकडा कुणाला तारणार, कुणाला मारणार ? महायुतीचे पारडे जड

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणात आगामी काळात होणारी विधान परिषदेची निवडणूक अत्यंत चुरशीची ठरणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे. विधानसभा सदस्यांमधून निवडून द्यावयाच्या ९ जागांसाठी एप्रिलमध्ये प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता असून, सध्याच्या संख्याबळाचा विचार करता 'महायुती' ८ जागांवर आपला झेंडा फडकवण्याची शक्यता आहे, तर 'महाविकास आघाडी'ला (मविआ) केवळ एका जागेवर समाधान मानावे लागण्याची चिन्हे आहेत.

येत्या १३ मे २०२६ रोजी विधान परिषदेच्या नऊ दिग्गज सदस्यांचा सहा वर्षांचा कार्यकाल पूर्ण होत आहे. यामध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील बड्या नावांचा समावेश आहे:

१. उद्धव ठाकरे (शिवसेना उबाठा)
२. डॉ. नीलम गोऱ्हे (शिवसेना - शिंदे गट)
३. शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी - शरद पवार गट)
४. अमोल मिटकरी (राष्ट्रवादी - अजित पवार गट)
५. प्रवीण दटके (भाजप)
६. रमेश कराड (भाजप)
७. रणजितसिंह मोहिते-पाटील (भाजप)
८. निलय नाईक (भाजप)
९. राजेश राठोड (काँग्रेस)

**कोणाचा पत्ता कट?**

या नऊ जागांपैकी भाजप आपल्या संख्याबळाच्या जोरावर ५ जागा सहज खिशात टाकू शकते. यामध्ये प्रवीण दटके, रमेश कराड, रणजितसिंह मोहिते-पाटील आणि निलय नाईक या निवृत्त होणाऱ्या सदस्यांपैकी कोणाला पुन्हा संधी मिळते की भाजप नवीन चेहऱ्यांना वाव देते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना पुन्हा संधी मिळण्याची दाट शक्यता असली तरी, पक्षात इच्छुकांची मोठी फळी असल्याने शिंदेंची कसरत होणार आहे.

मविआमध्ये 'एका' जागेसाठी रस्सीखेच

महाविकास आघाडीकडे सध्या केवळ एक जागा निवडून येईल इतकेच संख्याबळ आहे. अशा स्थितीत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे स्वतः पुन्हा विधान परिषदेत जाणार का? हा मोठा प्रश्न आहे. मात्र, काँग्रेसनेही या जागेवर दावा ठोकला असून राजेश राठोड यांच्या पुनर्निवडीसाठी ते आग्रही राहू शकतात. दुसरीकडे, शरद पवार गटाचे शशिकांत शिंदे यांच्यासाठी ही निवडणूक अस्तित्वाची ठरेल. अजित पवार गट अतिरिक्त मतांच्या जोरावर अमोल मिटकरी यांच्यासह दुसऱ्या जागेसाठी आग्रही राहू शकतो, ज्यामुळे निवडणुकीत मोठी चुरस आणि 'घोडेबाजार' होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### माजी उपमहापौर तथा ज्येष्ठ नगरसेविका अलका केरकर यांचे निधन

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईच्या माजी उपमहापौर आणि मुंबई महापालिकेच्या प्रभाग ९८ च्या भाजपच्या विद्यमान ज्येष्ठ नगरसेविका अलका केरकर (७४) यांचे शनिवारी अल्पशा आजाराने लीलावती रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, मुलगी असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा मेफेयर अपार्टमेंट, १७ वा रस्ता, शिवाजी नगरसमोर, खार (पश्चिम) येथील राहत्या घरातून रविवारी सकाळी ११ वाजता निघेल. हिंदू स्मशानभूमी, शास्त्री नगर सांताक्रूझ (पश्चिम) येथे दुपारी १२ वाजता अंतिम संस्कार होतील. यावर्षी झालेल्या महापालिका निवडणुकीत बांद्रे (पश्चिम) प्रभाग ९८ मधून भाजपच्या तिकिटावर तिसऱ्यांदा नगरसेवक म्हणून त्या निवडून आल्या होत्या. २०१४-२०१५ या कालावधीत त्यांनी मुंबईच्या उपमहापौरपदाची जबाबदारी सांभाळली होती. त्या जमिनीशी जोडलेल्या नेत्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नागरी सुधारणा, आरोग्य आणि स्वच्छता या विषयांवर सक्रियपणे काम केले आहे. त्यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जवळचे संबंध होते. पक्ष संघटनेतही त्या सक्रिय होत्या. अतिशय शांत आणि प्रेमळ स्वभावाच्या नगरसेविका म्हणून त्यांची महापालिकेत ओळख होती.

### गॅस तुटवड्यातही कस्तुरबा रुग्णालयात जेवण अखंड; व्यवस्थापनाची कसरत

**मुंबई, प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय पातळीवरील इंधन तुटवड्याचे पडसाद मुंबईतील रुग्णालयांवर उमटत असताना कस्तुरबा रुग्णालय येथे रुग्णांच्या जेवणात कोणताही खंड पडू दिला जात नसल्याचे समोर आले आहे. मात्र, गरजेपेक्षा सुमारे चार गॅस सिलिंडर कमी मिळत असल्याने कैटीन व्यवस्थापनाला मोठ्या कसरतीने सेवा सुरू ठेवावी लागत आहे. दररोज सुमारे सात ते आठ सिलिंडरची आवश्यकता असताना प्रत्यक्षात चार ते पाच सिलिंडरवरच काम भागवावे लागत आहे. तरीही सुमारे अडीच हजार रुग्ण, डॉक्टर व परिचारिकांसाठी वेळेवर जेवण पुरवले जात आहे. सिलिंडर टंचाईमुळे कँटीनमध्ये पर्यायी उपायांचा अवलंब केला जात असून, अंडी उकडण्यासाठी हिटरचा वापर करण्यासारखे पर्याय वापरले जात आहेत. वेळेचे नियोजन आणि पर्यायी साधनांचा वापर करून सेवा सुरू ठेवली आहे, असे कॅटीन व्यवस्थापक अतिश शिवशरण यांनी सांगितले.

### खारमध्ये पुराचा धोका टळणार; साउथ अव्हेन्यू नाल्याची भिंत बांधण्याचा निर्णय

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेने साउथ अव्हेन्यू नाल्याची भिंत बांधण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी तब्बल १ कोटी ७८ लाख ३० हजार रुपये खर्च करण्यात येणार आहेत. हे काम वर्षभरात पूर्ण करण्यात येणार असल्यामुळे २०२७ मध्ये खारमध्ये येणाऱ्या पुराचा धोका टळणार आहे. खार पश्चिमेला असलेल्या साऊथ अव्हेन्यू या नाल्याची संरक्षण भिंत ८ जुलै २०२४ मध्ये अचानक कोसळली होती. त्यामुळे भर पावसात नाल्यातील पाणी आजूबाजूच्या परिसरात पसरले होते. त्यामुळे पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. साउथ अव्हेन्यू नाल्याची लांबी सुमारे २०० मीटर असून सरासरी रुंदी ७.८० मीटर इतकी आहे. ब्रीमस्टोवंड अहवालानुसार पा नाल्याची रुंदी वाढवण्याची आवश्यकता नाही. परंतु नाल्याची संरक्षण भित बांधणे आवश्यक असल्यामुळे महापालिकेने तातडीने निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची नियुक्ती केली आहे. या भिंतीचे काम मे २०२७ पर्यंत पूर्ण होईल, असे पालिकेकडून सांगण्यात आले.

### रोहित शेट्टी गोळीबारप्रकरणी मुख्य आरोपी गोलू यूपीतून अटकेत

**मुंबई, प्रतिनिधी**

बॉलीवूडचे निर्माता-दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या घराजवळील गोळीबारप्रकरणी प्रदीप राधामोहन शर्मा ऊर्फ गोलू नावाच्या एका मुख्य आरोपीस गुन्हे शाखा आणि उत्तर प्रदेश एसटीएफच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. गोलू हा या गुन्ह्यांत अटक झालेला चौदावा आरोपी असून त्याला रविवारी दुपारी मोक्का नयायालयात हजर केले जाणार आहे. ३१ जानेवारीला रात्री उशिरा रोहित शेट्टी यांच्या जुहू येथील घराजवळ अज्ञात व्यक्तीने फायरिंग कैले होते. या प्रकरणी आतापर्यंत तेरा आरोपीना पोलिसांनी अटक केली. मात्र, प्रदीप शर्मा प्रत्येक वेळेस पोलिसांना गुंगारा देत होता. तो उत्तरप्रदेशात लपला असल्याची माहिती मिळताच एसटीएफचे पोलीस निरीक्षक आकाश सिंह, उपनिरीक्षक योगेंद्र सिंह, मुंबई गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल माळी, उपनिरीक्षक स्वप्निल काळे व अन्य पोलीस पथकाने प्रदीपला महाबीरनगर परिसरातून शिताफीने अटक केली. प्रदीप हा मूळचा उत्तरप्रदेशच्या आग्रा, मोहल्ला महावीरनगरचा रहिवासी आहे. शुभम लोणकरच्या पोस्ट पाहून तो त्याच्या टोळीत सामील झाला.

### महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक संविधानविरोधी : प्रकाश आंबेडकर

**मुंबई, प्रतिनिधी**

'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य-२०२६' हे विधेयक संविधानाच्या मूलभूत तत्त्वांचे उल्लंघन करणारा कायदा असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केला. या विधेयकाच्या माध्यमातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप धार्मिक ध्रुवीकरणाला चालना देत असल्याची टीकाही त्यांनी केली. महायुती सरकारने महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत बहुमताने मंजूर झाले आहे. मात्र, या विधेयकाला आंबेडकर यांनी विरोध केला आहे. यासंदर्भात एक्सवरून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. धार्मिक धर्मांतरांना आळा घालण्यासाठी प्रस्तावित केलेले हे विधेयक कायदेशीर कसोटीवर टिकणार नाही. भारतीय संविधानाने नागरिकांना धर्मस्वातंत्र्य आणि विवाहाचे मूलभूत अधिकार दिले असून, कोणत्याही कारणाने या अधिकारांवर मर्यादा आणणारा कायदा घटनाबाह्य ठरू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

### नोकरीच्या आमिषाने अल्पवयीन मुलीवर मित्राकडूनच अत्याचार

**मुंबई, प्रतिनिधी**

नोकरीच्या आमिषाने एका सतरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर तिच्याच मित्राने लैंगिक अत्याचार केला. हॉटेलमध्ये नेताना त्याने तिच्या आधारकार्डमध्ये फेरफार करुन जन्मतारीखेत बदल केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. याप्रकरणी लैंगिक अत्याचारासह पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल होताच आरोपी मित्राला पार्कसाईट पोलिसांनी अटक केली. याच गुन्ह्यात तो सध्या पोलीस कोठडीत असून त्याची पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. पिडीत मुलगी सतरा वर्षांची असून ती सध्या चेंबूर परिसरात राहते. आरोपी घाटकोपर येथे राहत असून एका कपड्याच्या दुकानात कामाला आहे. नोकरीच्या आमिषाने जवळीक साधून त्याने तिचे आधारकार्ड घेऊन त्यात तिच्या जन्मतारीखेत फेरफार केले होते. या आधारकार्डवरुन त्याने तिला एका हॉटेलमध्ये आणले होते. तिथेच तिच्यावर त्याने लैंगिक अत्याचार केला. गेल्या तीन ते चार महिन्यांत त्याने तिच्यावर अनेक वेळा लैंगिक अत्याचार केले होते. फसवणूक होत असल्याचे लक्षात येताच तिने घडलेला प्रकार पार्कसाईट पोलिसांना सांगून आरोपी मित्राविरुद्ध तक्रार केली होती. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध लैंगिक अत्याचारासह पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल केला होता. गुरुवारी पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याला विशेष सत्र न्यायालयात हजर केले असता पोलीस कोठडी सुनावली आहे.

# शाळेच्या गेटवरच 'विषाचा' विळखा? सरकारची मोठी धडक कारवाई, कोटींचा दंड वसूल!

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर कडक बंदी असतानाही, अनेक ठिकाणी नियमांना धाब्यावर बसवून हा जीवघेणा व्यवसाय सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत राज्य सरकारने आता 'धडक मोहीम' हाती घेतली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोट्यवधींचा दंड ठोठावण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधान परिषदेत या कारवाईचा सविस्तर पाढा वाचला.

आमदार प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्र्यांनी सांगितले की, एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या काळात तंबाखूजन्य पदार्थांच्या बेकायदा विक्रीप्रकरणी तब्बल २३ हजारांहून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईतून आतापर्यंत ३.७७ कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. केवळ तंबाखूच नव्हे, तर याच काळात जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत ३३,२२१ आणि दारूबंदी कायद्यान्वये १.२३ लाखांहून अधिक केसेस दाखल करून गुन्हेगारांचे कंबरडे मोडले आहे.

पुणे, सांगली आणि ठाणे जिल्ह्यात या मोहिमेचा मोठा प्रभाव दिसून आला. पिंपरी-चिंचवडमध्ये शाळांच्या परिसरातून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, तर ठाण्यातील शहापूर येथे एकाच कारवाईत जवळपास १ लाख रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शाळांच्या परिसरात प्रतिबंधित अन्नपदार्थ विकणाऱ्या ६७ आस्थापनांची कसून तपासणी करण्यात आली असून, दोषींवर तातडीने एफआयआर (FIR) नोंदवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

केवळ कारवाई करून सरकार थांबलेले नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर 'अँटी नार्कोटिक्स स्कॉड' सज्ज करण्यात आले आहे. शाळा-कॉलेजमध्ये 'नशामुक्त अभियान' राबवून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती केली जात आहे. शिक्षणाचे माहेरघर असलेल्या शाळांच्या परिसराला या व्यसनांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी सरकार आता अधिक आक्रमक झाले असून, येणाऱ्या काळात ही मोहीम अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# मंत्रालयाला हादरवणारा 'खरात' पॅटर्न

## बदल्यांच्या बाजारात नोटांऐवजी जमिनीचा व्यवहार?

**मुंबई, प्रतिनिधी**



राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात सध्या एकाच नावाची जोरदार चर्चा सुरू आहे, ती म्हणजे 'खरात'. अशोक खरात प्रकरणाने आता अशा वळणावर येऊन ठेपले आहे, ज्याने केवळ राजकारणच नव्हे तर संपूर्ण मंत्रालयाची झोप उडवली आहे. साध्या वाटणाऱ्या या प्रकरणाच्या मुळाशी गेल्यावर सत्ता आणि भ्रष्ट व्यवस्थेचे असे काही धागेदोरे हाती लागले आहेत, ज्याने प्रशासकीय यंत्रणेची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत.

सूत्रांकडून मिळालेल्या धक्कादायक माहितीनुसार, बड्या सरकारी अधिकाऱ्यांना आपल्या सोयीची आणि 'चॉईस पोस्टिंग' हवी असल्यास ते खरात याच्या संपर्कात असायचे. विशेष म्हणजे, अशा बदल्यांसाठी खरात याच्या एका कथित 'दरबारात' अधिकाऱ्यांच्या रांगा लागायच्या. सरकारी बदल्यांसारख्या अत्यंत संवेदनशील आणि गोपनीय निर्णियांवर एका बाह्य व्यक्तीचा इतका प्रभाव असावा, ही बाब आता संपूर्ण सिस्टिमसाठी चिंतेचा विषय ठरली आहे.

या प्रकरणातील सर्वात खळबळजनक खुलासा म्हणजे व्यवहाराची पद्धत. या कथित देवाणघेवाणीत रोख रकमेऐवजी चक्क जमिनीतील गुंतवणुकीच्या माध्यमातून 'दक्षिणा' दिली जात असल्याचे समोर येत आहे. जर हे आरोप सिद्ध झाले, तर हा केवळ भ्रष्टाचाराचा गुन्हा न ठरता, सरकारी निर्णय प्रक्रियेत बाहेरील समांतर यंत्रणेचा हस्तक्षेप असल्याचे स्पष्ट होईल.

या खुलाशानंतर मंत्रालयातील वातावरण कमालीचे तणावपूर्ण झाले आहे. खरात याचे जाळे नेमके किती खोलवर पसरले होते आणि कोणकोणते बडे अधिकारी त्याच्या दरबारात हजेरी लावत होते, याची चर्चा आता रंगू लागली आहे. जरी अद्याप या दाव्यांना अधिकृत दुजोरा मिळालेला नसला, तरी समोर आलेली माहिती प्रशासकीय पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करत आहे.

हा तपास आता एका व्यक्तीपुरता मर्यादित न राहता सत्ता, प्रशासन आणि प्रभाव यांच्यातील एका मोठ्या 'नेक्सस'ची चौकशी बनला आहे. आता प्रश्न हाच उरतो की, खरात हे फक्त एक नाव आहे की सिस्टिमच्या आत दबा धरून बसलेल्या एखाद्या मोठ्या खेळाचा हा एक छोटासा मोहरा?

# लिंबू-टाचण्यांचे राजकारण थांबवा, पाणी कुठपर्यंत मुरलंय तेच बघू द्या

## उद्धव ठाकरेंचा थेट इशारा

**मुंबई, प्रतिनिधी**

"राज्यात सध्या जे भोंदूगिरीचे प्रकार समोर येत आहेत, ते पाहता आपण नेमके कोणत्या पातळीवर उतरणार आहोत?" असा संतप्त सवाल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. मुंबईत 'एक्सपोर्ट इम्पोर्ट लॉजिस्टिक कोर्स'च्या शुभारंभप्रसंगी बोलताना त्यांनी अशोक खरात प्रकरणावरून सरकारवर जोरदार प्रहार केला.

**भोंदूगिरी आणि कायद्याचे रक्षक**

पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी कायदा अस्तित्वात आहे. मात्र, जर कायद्याचे रक्षकच अशा भोंदूबाबांच्या आहारी जाणार असतील, तर त्यांच्यावरही कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. "आम्ही महाराष्ट्राला प्रगतीच्या दिशेने नेण्याचा विचार करत असताना दुसरीकडे लिंबू आणि टाचण्यांचे विषय समोर येणे हे दुर्दैवी आहे," अशी चपराक त्यांनी लगावली.

**'कर्तृत्वशून्य' लोकांचे मार्ग**

सध्या गाजत असलेल्या फोटोंवर भाष्य करताना ठाकरे यांनी खोचक टोला लगावला. ते म्हणाले की, ज्यांच्याकडे स्वतःचे असे कोणतेही कर्तृत्व नसते, त्यांनाच अशा अघोरी मार्गांचा अवलंब करावा लागतो. मुख्य विषयांवरून लोकांचे लक्ष भरकटवण्यासाठी अशा गोष्टी मुद्दाम समोर आणल्या जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**चौकशीचे खुले आव्हान**

महाविकास आघाडी सरकारच्या काळातील आरोपांना उत्तर देताना उद्धव ठाकरे यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. "तुम्ही कोणाचीही आणि कसलीही चौकशी करा, आमची काहीच हरकत नाही. उलट ही चौकशी झालीच पाहिजे, जेणेकरून या भोंदूगिरीचे पाणी नक्की कुठपर्यंत मुरले आहे, हे जनतेला स्पष्टपणे समजेल," असे आव्हान त्यांनी सत्ताधाऱ्यांना दिले.

**झेंडा कोणताही असो, कारवाई करा!**

भोंदूगिरीचा नायनाट करण्यासाठी त्यांनी एक महत्त्वाची मागणी केली. गावोगावी पसरलेल्या अशा भोंदूबाबांवर आणि त्यांच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या शक्तींवर कारवाई व्हायला हवी. "अशा लोकांच्या हातात कोणत्याही पक्षाचा झेंडा असला, तरी त्यांच्यावर कारवाई करताना कच खाऊ नका," असे स्पष्ट आदेशवजा आवाहन त्यांनी प्रशासनाला केले आहे.

# शिंदेंचा 'दिल्ली दरबार' आणि दोन खास शिलेदारांची 'शाळा'

## त्या एका भेटीने राजकीय वर्तुळात खळबळ

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणाचे केंद्र अचानक मुंबईहून दिल्लीला सरकले असून, शिवसेना शिंदे गटांतर्गत सुरू असलेल्या पडद्यामागच्या हालचालींनी आता वेगळेच वळण घेतले आहे. राज्यसभा निवडणुकीत ज्योती वाघमारे यांना मिळालेली अनपेक्षित उमेदवारी आणि माजी खासदार राहुल शेवाळे यांचा पत्ता कट होण्यामागे केवळ नाराजी नसून, 'दिल्लीत' घडलेली एक गुप्त घडामोड कारणीभूत असल्याची चर्चा रंगली आहे.

मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकत्याच झालेल्या दिल्ली दौऱ्यात दोन दिग्गज नेत्यांची—मंत्री उदय सामंत आणि राहुल शेवाळे—जबरदस्त 'शाळा' घेतल्याचे समजते. विशेष म्हणजे, ही कानउघडणी मुंबईत न करता दिल्लीतील खासदार श्रीकांत शिंदे यांच्या निवासस्थानी 'बंद दाराआड' करण्यात आली, जेणेकरून या वादाची कुणकुण विरोधकांना लागणार नाही.

या सर्व प्रकरणाच्या मुळाशी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतील पक्षाची सुमार कामगिरी असल्याचे बोलले जात आहे. 'मुंबईची जबाबदारी माझ्यावर सोडा' असा शब्द देणाऱ्या शेवाळेंच्या नेतृत्वाखाली पक्षाला अपेक्षित असलेल्या ५०-६० जागांऐवजी जेमतेम २९ जागांवर समाधान मानावे लागले. प्रचंड 'धनशक्ती' वापरूनही पदरी आलेले हे अपयश आणि निवडणुकीतील आर्थिक व्यवहारांबाबत पक्षांतर्गत उमटलेले पडसाद, यामुळे नेतृत्वाची नाराजी ओढवून घेतली गेली.

मात्र, या नाराजीला खरी फोडणी मिळाली ती भाजपच्या एका बड्या नेत्यासोबत वाढलेल्या जवळीकीमुळे. उदय सामंत आणि राहुल शेवाळे यांचा स्वतंत्र गट सक्रिय असून, त्यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी वाढलेली घनिष्ठता शिंदे पिता-पुत्रांना खटकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. स्वतःच्याच पक्षातील शिलेदार दुसऱ्या शक्तीकेंद्राच्या जवळ जात असल्याची कुणकुण लागताच, एकनाथ शिंदेंनी या दोघांना तातडीने दिल्लीला पाचारण केले आणि त्यांची 'राजकीय शाळा' घेतली.

मुंबई महानगरपालिकेतील सत्तेचे गणित काठावर आल्याने आणि पक्षाची पकड सैल होत चालल्याने, एकनाथ शिंदे आता 'ॲक्शन मोड'मध्ये आले आहेत. राज्यसभा उमेदवारी नाकारून शेवाळेंना दिलेला झटका हा भविष्यातील मोठ्या बदलांची नांदी मानला जात आहे. या दिल्लीतील 'शाळे'नंतर आता सामंत आणि शेवाळे यांची पुढची पावले नेमकी कोणत्या दिशेला पडतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# मराठवाड्यात अस्मानी संकट

**मुंबई, प्रतिनिधी**



मराठवाड्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अस्मानी संकटाने बळीराजाच्या तोंडचा घास हिरावून घेतला आहे. अवकाळी पाऊस आणि अचानक झालेल्या गारपिटीने विभागातील तब्बल ११ हजार ५७२ हेक्टरवरील उभ्या पिकांची धूळधाण केली आहे. या अस्मानी संकटाचा सर्वाधिक तडाखा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला बसला असून, येथे सलग दोन दिवस झालेल्या पावसाने ८ हजार ४५५ हेक्टरवरील शेती मातीमोल झाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, जिल्ह्यातील १५ हजार ३०२ शेतकऱ्यांना या नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका बसला आहे. ही आकडेवारी प्रशासकीय अंदाजावर आधारित असली, तरी प्रत्यक्ष नुकसानीचा आकडा यापेक्षा कितीतरी पटीने अधिक असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हातातोंडाशी आलेला गहू, हरभरा, मका आणि बाजरी ही पिके आडवी झाली आहेत. केवळ धान्यच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या हक्काची 'कॅश क्रॉप्स' समजल्या जाणाऱ्या आंबा आणि मोसंबीच्या फळबागांनाही या गारपिटीने उद्ध्वस्त केले आहे.

सध्या सर्वत्र पंचनाम्याची प्रक्रिया सुरू असली, तरी हवामान खात्याने पुढील दोन दिवस पुन्हा पावसाचा इशारा दिला आहे. या अंदाजामुळे उरले सुरले पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू असून संपूर्ण ग्रामीण भागात भीतीचे वातावरण पसरले आहे. शेतात राबून पिकवलेलं सोनं आता चिखलात मिसळताना पाहून बळीराजा हवालदिल झाला असून, शासनाकडून तातडीच्या मदतीची प्रतीक्षा केली जात आहे.

# चाकणकरांचा राजीनामा म्हणजे केवळ 'छोटा मासा', खरा 'मगरमच्छ' कोण?

**मुंबई, प्रतिनिधी**



"राज्य महिला आयोगाच्या अकार्यक्षम अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी अखेर राजीनामा दिला असला, तरी त्यांचा सत्तेचा माज अद्याप उतरलेला नाही," अशा जळजळीत शब्दांत विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात महिला आयोगाच्या प्रतिमेला काळे फासल्यानंतरही चाकणकर यांनी ज्या पद्धतीने राजीनामा दिला, त्यावरून वडेट्टीवार यांनी सडकून टीका केली आहे.

वडेट्टीवार यांनी आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून या प्रकरणातील गंभीर त्रुटींवर बोट ठेवले आहे. "स्वेच्छेने आणि वैयक्तिक कारणासाठी राजीनामा देत असल्याचा उल्लेख पत्रात करणे, हा निव्वळ दांभिकपणा आहे. खरात प्रकरणात पीडित महिलांवर आणि सत्य मांडणाऱ्या पत्रकारांवर जो दबाव टाकला गेला, त्याचे साधे दुःखही चाकणकरांना वाटत नाही का? राजीनामा देतानाही उपकार केल्यागत वागणे हे संतापजनक आणि निषेधार्ह आहे," असे वडेट्टीवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

या प्रकरणाचा खरा सूत्रधार शोधण्याची मागणी करताना वडेट्टीवार म्हणाले की, "रुपाली चाकणकर हा तर या प्रकरणातील केवळ एक 'छोटा मासा' आहे. खरा प्रश्न हा आहे की, या बलात्कारी बाबाला कोणी 'राजाश्रय' दिला? त्याला वाचवण्यासाठी मंत्रालयातून कोणत्या मंत्र्यांनी आणि बड्या नेत्यांनी पोलिसांना फोन फिरवले? हे प्रकरण दडपण्यासाठी सत्तेचा गैरवापर करणाऱ्या त्या अदृश्य शक्तींची तात्काळ चौकशी होऊन कारवाई झाली पाहिजे."

विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले आहे की, केवळ एका राजीनाम्याने हे प्रकरण संपणार नाही. भोंदूगिरीच्या नावाखाली महिलांचे शोषण करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या प्रत्येक मंत्र्याचा आणि नेत्याचा बुरखा फाडल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. या 'रॉयल' भोंदूगिरीच्या मागे नेमके कोणते मोठे 'मगरमच्छ' दडले आहेत, हे आता जनतेसमोर आणण्याचे मोठे आव्हान सरकारसमोर उभे ठाकले आहे.

# मुंबईत उष्णतेची लाट

**मुंबई, प्रतिनिधी**




मार्च महिन्याच्या तिसऱ्या वीकेंडला पुन्हा उन्हाचे चटके बसू लागले आहेत. पारा चाळिशीच्या घरात गेल्याने सोमवार, मंगळवारी (२३ आणि २४ मार्च) उष्णतेच्या लाटेचा अंदाज भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) वर्तविला आहे.

आठवड्याच्या सुरुवातीच्या दिवसांच्या तुलनेत शुक्रवारपासून तापमानात वाढ झाली. सांताक्रूझ बेधशाळेमध्ये शनिवारी किमान २३ आणि कमाल ३५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. रविवारी त्याचीच पुनरावृत्ती अपेक्षित आहे. पारा पस्तिशीमध्ये गेल्याने मुंबई शहर आणि उपनगरे तसेच आजूबाजूच्या जिल्ह्यांमध्ये उन्हाचे चटके बसू लागले आहेत. वेधशाळेच्या माहितीनुसार, तापमान ३५ अंशांवर गेले तरी प्रत्यक्षात जाणवणारे तापमान अधिक होते. त्यामुळे दुपारी घराबाहेर पडणाऱ्यांना उन्हाचा मोठा तडाखा बसला.

रमझान ईदनिमित्त शनिवारी सार्वजनिक सुट्टी असल्याने मुंबईतील चौपाट्यांवर गर्दी होती. प्रखर उन्हामुळे अनेकांनी झाडांच्या सावलीचा आधार घेतल्याचे दिसून आले. खूप ऊन असल्याने संध्याकाळी गर्दीत वाढ झाली.

सोमवारपासून तापमान आणखी वाढण्याची शक्यता आहे. २३ आणि २४ मार्च रोजी कमाल तापमान सरासरी ३६ अंश सेल्सिअस राहील. त्यामुळे दोन्ही दिवशी उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. दोन्ही दिवशी घराबाहेर पडताना पुरेशी खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# संपादकीय

## प्रासंगिकता गमावणारे संयुक्त राष्ट्र

पश्चिम आशियातील वाढते लष्करी संघर्ष आणि रशिया-युक्रेन युद्ध यांसारख्या युद्धांनी केवळ जागतिक पुरवठा साखळ्या विस्कळीत केल्या नाहीत, तर भू-राजकीय तणावामुळे संपूर्ण जगासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. ऊर्जा दरांमध्ये झालेल्या तीव्र वाढीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्थेत अस्थिरता निर्माण झाली असून चलन विनिमय दरांवरील दबाव वाढल्याने जगभरातील अर्थव्यवस्था प्रभावित होत आहेत. आज प्रत्येक देश—तो विकसित असो वा विकसनशील—महागाई, बेरोजगारी आणि मंद आर्थिक वाढ यांसारख्या आव्हानांना सामोरा जात आहे. जागतिक भू-राजकारणातील बदल केवळ राजकीय संतुलनावर परिणाम करत नाहीत, तर जागतिक अर्थव्यवस्था, व्यापार, ऊर्जा पुरवठा आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भूमिकेलाही खोलवर प्रभावित करतात. या परिस्थितीत संयुक्त राष्ट्र यांच्याकडून अपेक्षा होती की ते विविध देशांमध्ये संवाद प्रस्थापित करून, संघर्ष टाळून आणि कूटनीतिक तोडगे काढून जागतिक स्थैर्य टिकवून ठेवतील. मात्र वास्तव असे आहे की संयुक्त राष्ट्र या अपेक्षांवर पूर्णपणे उतरू शकलेले नाही. मोठ्या देशांमधील वाढता अविश्वास, हितसंबंधांचा संघर्ष आणि सत्ताकेंद्री राजकारण यामुळे संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद सारखी संस्था देखील निर्णायक हस्तक्षेप करण्यात अपयशी ठरली आहे. परिणामी युद्धे दीर्घकाळ सुरू राहत आहेत आणि त्यांचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर अधिकच गंभीर होत आहे. पश्चिम आशियात इराण, इस्रायल आणि इतर प्रादेशिक शक्तींमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांच्या चेतावण्या केवळ प्रतीकात्मक ठरत आहेत. एका बाजूला शांतता आणि संवादाचे आवाहन केले जाते, तर दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात क्षेपणास्त्र हल्ले, लष्करी कारवाया आणि नागरिकांच्या मृत्यूंची संख्या सातत्याने वाढत आहे. ही दरी केवळ कूटनीतिक कमकुवतपणाचे नव्हे, तर जागतिक शक्तिसंतुलनाच्या वास्तवाचेही द्योतक आहे. हे स्पष्ट आहे की संयुक्त राष्ट्रांची कूटनीतिक प्रक्रिया आजच्या वेगवान आणि गुंतागुंतीच्या युद्धपरिस्थितींशी सुसंगत राहिलेली नाही. युद्धांचे स्वरूप झपाट्याने बदलत असताना संयुक्त राष्ट्रांची प्रतिक्रिया तुलनेने धीमी आणि औपचारिक राहते, ज्यामुळे त्यांच्या विश्वासार्हतेवर आणि प्रासंगिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. द्वितीय महायुद्ध नंतर जागतिक स्तरावर सहकार्य, संवाद, शांतता आणि भविष्यातील युद्धे टाळण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची स्थापना करण्यात आली. सुरुवातीच्या दशकांत या संस्थेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, परंतु बदलत्या जागतिक परिस्थितीत तिची रचना आणि कार्यपद्धती काळानुरूप बदलण्यात अपयशी ठरत आहे. त्या काळी सत्ता काही मोजक्या देशांच्या हाती केंद्रित होती, परंतु आज जागतिक सत्ता बहुध्रुवीय झाली आहे. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील देशांचा प्रभाव वाढला आहे. भारत, चीन, ब्राझील आणि इतर उदयोन्मुख अर्थव्यवस्था जागतिक राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अशा वेळी संयुक्त राष्ट्रांचे पुनर्गठन आणि बळकटीकरण अत्यावश्यक ठरते, जेणेकरून ही संस्था पुन्हा प्रभावी होऊन जगाला अधिक सुरक्षित, संतुलित आणि योग्य दिशा देऊ शकेल. या प्रक्रियेत भारतासारख्या जबाबदार आणि लोकशाही राष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. संयुक्त राष्ट्रांसमोरील सर्वात मोठे आव्हान केवळ निष्क्रियता नसून त्यांची रचनात्मक अडचण आहे. व्हेटो शक्तीच्या राजकारणामुळे जागतिक शांततेचे प्रयत्न वारंवार अडथळ्यात येतात. सर्वप्रथम सुरक्षा परिषदेचा विस्तार करणे आवश्यक आहे, जेणेकरून भारत, जपान, जर्मनी आणि ब्राझील यांसारख्या देशांना योग्य प्रतिनिधित्व मिळेल आणि ही संस्था सध्याच्या जागतिक वास्तवाचे प्रतिबिंब बनू शकेल. व्हेटो शक्तीच्या व्यवस्थेतही सुधारणा करणे गरजेचे आहे, जेणेकरून एखादा एक देश जागतिक शांततेच्या प्रयत्नांना अडथळा आणू शकणार नाही. निर्णय प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि जबाबदार बनवणे आवश्यक आहे, ज्यामुळे संकटकाळात प्रभावी आणि वेळेवर कारवाई होऊ शकेल. ही संस्था मानवीय मदत, शांतता प्रस्थापना आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संरक्षणासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आली आहे. विश्व खाद्य कार्यक्रम आणि युनिसेफ यांसारख्या संस्थांनी जगभरातील लाखो लोकांचे जीवन सुरक्षित करण्यास हातभार लावला आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र अधिक प्रभावी आणि सक्षम बनवणे ही काळाची गरज आहे. विशेषतः निर्णय प्रक्रियेला गती देणे, भू-राजकारणाचा प्रभाव संतुलित करणे आणि जागतिक आर्थिक हितांचा विचार करून धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्र ही केवळ एक संस्था नसून, ती मानवतेच्या त्या आशेचे प्रतीक आहे जी युद्ध आणि संघर्षांपलीकडे शांततामय जगाची कल्पना करते. ही आशा जिवंत ठेवण्यासाठी संयुक्त राष्ट्र अधिक बळकट करणे आवश्यक आहे, नष्ट करणे नव्हे.

## संकटाचा सामना

पश्चिम आशियातील दीर्घकाळ चाललेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी आपल्या मंत्र्यांसोबत आपत्कालीन बैठक घेऊन देशभरात ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या तयारीवर चर्चा केली, ही काळाची गरजच होती. या बैठकीत पेट्रोल-डिझेल, गॅस तसेच खतांच्या पुरवठ्याला सुलभ ठेवण्यासाठी जे उपाय विचारात घेण्यात आले, त्यांचे निष्कर्ष राज्य सरकारांपर्यंत पोहोचवणे आणि त्यांना आवश्यक सूचना देणे गरजेचे आहे. ज्या पद्धतीने केंद्र सरकार संकटावर मात करण्यासाठी सज्ज होताना दिसत आहे, त्याचप्रमाणे राज्य सरकारांनीही सक्रियता दाखवणे आवश्यक आहे. या दृष्टीने पंतप्रधानांनी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी आणि मुख्य सचिवांशी संवाद साधून देशभरात कुठेही ऊर्जा किंवा खतांचा तुटवडा निर्माण होऊ दिला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश देणे हितावह ठरेल. सध्याची परिस्थिती कोविड-19 काळासारखी नसली, तरी आवश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत ठेवणे आणि त्यांची काळाबाजार व साठेबाजी रोखणे याकडे विशेष लक्ष देण्याची गरज वाढली आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी केवळ ऊर्जा साधनांचा पुरवठा सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित न करता अर्थव्यवस्थेची गती कायम राखण्याचाही प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी जास्त जोखमीच्या क्षेत्रांची ओळख करून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध चौथ्या आठवड्यात प्रवेश करत असून ते कधी आणि कसे संपेल याबाबत अनिश्चितता कायम आहे. त्यामुळे पश्चिम आशियातून होणाऱ्या तेल आणि गॅस पुरवठ्यावरील ताण आणखी वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय बाजारात तेल आणि गॅसच्या किमती वाढू शकतात, ज्याचा परिणाम भारतातही होऊ शकतो. त्यामुळे सरकारला इंधनाच्या किमती वाढवण्याची वेळ येऊ शकते आणि त्याचा परिणाम महागाईवर होण्याची शक्यता आहे. पाश्चात्य देशांमध्ये हवाई प्रवास आधीच महाग झाला असल्याचे दिसून येते. आशा आहे की किमती वाढवण्याची वेळ येणार नाही; मात्र प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्ज राहणे आवश्यक आहे. ही तयारी केवळ केंद्र सरकारपुरती मर्यादित न राहता राज्य सरकारे आणि जिल्हा प्रशासन पातळीवरही असावी. त्याचबरोबर सामान्य नागरिकांनीही हे लक्षात घ्यावे की या संकटात भारत सरकारची थेट भूमिका नाही. त्यामुळे काही अडचणी निर्माण झाल्यास नागरिकांनी संयम राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणतेही संकट प्रभावीपणे हाताळण्यासाठी शासन-प्रशासन आणि जनतेमध्ये समन्वय व विश्वास असणे आवश्यक असते. सर्वांनी मिळून सकारात्मक दृष्टिकोन ठेवला, तर कोणत्याही कठीण परिस्थितीतून मार्ग काढणे शक्य होते.

# जगावर घोंगावणारा मंदीचा धोका



इराणवर इस्रायल-अमेरिका यांच्या हल्ल्यांना तीन आठवडे उलटून गेले असले तरी त्याची झळ आता संपूर्ण जगाला बसत आहे. युद्धात रक्तपात आणि लष्करी खर्च वाढतोच, पण त्याचबरोबर अडचणींची अखंड मालिका सुरू होते. दैनंदिन वापराच्या वस्तूंवरील वाढता दबाव आणि उत्पादनातील मंदी ही त्याची ठळक उदाहरणे आहेत. तेल-गॅसच्या टंचाईमुळे परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे.

थेट आर्थिक भाराच्या दृष्टीने पाहिले तर केवळ पहिल्याच आठवड्यात अमेरिकेला सुमारे ११.३ अब्ज डॉलर्स खर्च करावे लागले. युद्धसंबंधित मोर्चा अधिक बळकट करण्यासाठी पेंटागनने वार्षिक ८३८ अब्ज डॉलर्सच्या संरक्षण अर्थसंकल्पाव्यतिरिक्त आणखी २०० अब्ज डॉलर्सची मागणी केली आहे. ही रक्कम अमेरिकेने मागील वर्षी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अन्नसहाय्य देण्यासाठी केलेल्या खर्चापेक्षाही अधिक आहे.

युद्धाची किंमत केवळ संरक्षण खर्चापुरती मर्यादित राहत नाही, तर त्याचा परिणाम व्यापक पातळीवर जाणवतो. होर्मुज सामुद्रधुनीतील अडथळा हे त्याचे महत्त्वाचे उदाहरण आहे. अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणने या अरुंद जलमार्गातील वाहतूक आपल्या नियंत्रणात घेतली आहे. परिणामी, जगभरातील तेल व गॅस पुरवठ्याचे समीकरण विस्कळीत झाले आहे. जगातील सुमारे २० टक्के तेलपुरवठा या मार्गावर अवलंबून असल्याने त्यावर गंभीर परिणाम झाला आहे. खाडी देशांतील तेल उत्पादनात दररोज सरासरी एक कोटी बॅरलपर्यंत घट झाली आहे.

होर्मुजमार्गे होणारी तेलवाहतूक युद्धापूर्वीच्या तुलनेत १० टक्क्यांपेक्षा कमी राहिली आहे. तेलाच्या किमती ७२ डॉलर्स प्रति बॅरलवरून वाढून ११३ डॉलर्सपर्यंत पोहोचल्या आहेत. अनेक तज्ज्ञ हे आतापर्यंतचे सर्वात मोठे तेलसंकट मानत आहेत. सामान्य नागरिकांसाठी याचा अर्थ पेट्रोल-डिझेल महागणे, स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती वाढणे, उद्योगांतील उत्पादन खर्च वाढणे आणि वाहतुकीचे दर वाढणे असा होतो. खतांच्या किमती वाढल्याने शेतीही महाग होते. तेलाच्या किमतीत १० टक्के वाढ झाली तर महागाई साधारणतः ०.४ टक्क्यांनी वाढते. युद्धानंतर तेलाच्या किमती ५० टक्क्यांपेक्षा अधिक वाढल्या आहेत.

गॅस पुरवठ्याचा प्रश्नही चिंताजनक ठरत आहे. कतार जगातील सुमारे २० टक्के गॅस पुरवतो. युरोपपासून आशियापर्यंत उद्योग, घरगुती वापर आणि खतनिर्मितीसाठी या गॅसवर मोठ्या प्रमाणात अवलंबित्व आहे. मार्च महिन्यात कतारमधील प्रमुख गॅस प्रकल्पावर दोनदा हल्ले झाले असून त्याचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे पुरवठा पूर्वपदावर येण्यासाठी बराच काळ लागणार आहे. जगात गॅसचे मोठे धोरणात्मक साठे उपलब्ध नसल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनत आहे. परिणामी, अवघ्या सहा दिवसांत युरियाच्या किमती ३२ टक्क्यांनी वाढल्या आहेत. भारतात लवकरच खरीप हंगामाची पेरणी सुरू होणार असल्याने या परिस्थितीचा शेतीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

ही घडामोड जागतिक मंदीची चाहूल तर नाही ना, असा प्रश्न निर्माण होत आहे. मंदी म्हणजे उत्पादन घटणे, रोजगाराच्या संधी कमी होणे, उत्पन्न घटणे आणि अर्थव्यवस्था मंदावणे. जगभरातील अर्थतज्ज्ञ मंदीची शक्यता स्पष्टपणे मान्य करण्यास टाळाटाळ करत असले तरी ती नाकारता येत नाही. युद्ध सुरू होण्यापूर्वीच परिस्थिती फारशी चांगली नव्हती. अनेक आर्थिक निर्देशकांनी पुढील वर्षात सुमारे ४९ टक्के मंदीची शक्यता दर्शवली होती, जी आता जवळपास ५० टक्क्यांपर्यंत वाढली आहे.

द्वितीय महायुद्धनंतरच्या काळात, महामारीसारख्या अपवादात्मक परिस्थिती वगळता, जवळपास प्रत्येक मोठ्या आर्थिक संकटामागे तेलाच्या किमतीतील झपाट्याने वाढ हे प्रमुख कारण राहिले आहे. सध्या जगातील प्रमुख केंद्रीय बँका कठीण परिस्थितीचा सामना करत आहेत. व्याजदर वाढविल्यास महागाईवर काही प्रमाणात नियंत्रण मिळते, पण आर्थिक वाढ खुंटते; तर व्याजदर कमी केल्यास वाढीस चालना मिळते, पण महागाई वाढण्याचा धोका असतो. फेडरल रिझर्व्हने अलीकडेच व्याजदर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, जो स्थैर्यापेक्षा अनिश्चिततेचेच द्योतक मानला जातो.

पश्चिम आशियातील युद्धामुळे अनेक उद्योगक्षेत्रे अडचणीत सापडली आहेत. रिअल इस्टेट प्रकल्प रखडत आहेत, कारण टाइल्ससारख्या वस्तूंची टंचाई निर्माण झाली आहे. टायर उद्योगांना पेट्रोलियम-आधारित कच्चामाल मिळण्यात अडचणी येत आहेत. कापड उद्योगात इंधनाच्या कमतरतेमुळे उत्पादन ठप्प झाले आहे. सध्या अनेक उद्योग साठवलेल्या ऊर्जेवर चालू आहेत, पण हे साठे मर्यादित आहेत.

इराणविरोधातील कारवाईचे समर्थन करणाऱ्या देशांचे म्हणणे आहे की ते अण्वस्त्रधोका टाळण्यासाठी हे पाऊल उचलत आहेत. मात्र, यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे, जी जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा आहे. हे युद्ध दीर्घकाळ चालल्यास जागतिक मंदीचा धोका अधिकच गडद होईल. जागतिक जीडीपीमध्ये ४ ते ५ टक्क्यांची घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थतज्ज्ञ सावध भूमिका घेत असले तरी आकडे आणि निर्देशक परिस्थितीची गंभीरता स्पष्टपणे दर्शवत आहेत.

# ट्रम्प यांची मनमानी, अहंकारामुळे जगाला संकटाकडे ढकलणारी भूमिका



अमेरिकाने इस्रायलसोबत मिळून इराणवर केलेल्या हल्ल्यांना तीन आठवडे उलटले, तरी या युद्धामागील अमेरिकेचा नेमका हेतू काय आहे आणि हे युद्ध कसे व कधी थांबेल, याबाबत अजूनही अनिश्चितता कायम आहे. इराणने या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना करण्याची भूमिका स्वीकारली आहे.

इराण इस्रायलला लक्ष्य करत असतानाच खाडी देशांतील नागरी ठिकाणे आणि ऊर्जा स्रोतांवरही हल्ले करत आहे, कारण त्या ठिकाणी अमेरिकन लष्करी तळ असल्याचा त्याचा दावा आहे. ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले करून त्याने युद्धाचा विस्तार केला असून होर्मुज सामुद्रधुनी या महत्त्वाच्या समुद्री मार्गात अडथळा निर्माण करून जागतिक ऊर्जा संकट अधिक तीव्र केले आहे.

अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्यासह अनेक सहकारी व लष्करी अधिकारी ठार झाल्याचे वृत्त असले, तरी तेथे सत्तांतराचे कोणतेही स्पष्ट संकेत दिसत नाहीत. सुरुवातीला डोनाल्ड ट्रम्प यांनी या कारवाईचा उद्देश इराणमध्ये सत्तांतर घडवून आणणे आणि त्याची अण्वस्त्र क्षमता नष्ट करणे असल्याचे सांगितले होते. मात्र युद्ध लांबत चालल्याने आणि तेल-गॅस पुरवठा खंडित झाल्याने त्यांचे दर वाढत आहेत, ज्याचा परिणाम भारतासह अनेक देशांमध्ये महागाई आणि बेरोजगारी वाढण्याच्या रूपात दिसू लागला आहे.

महाग ऊर्जा दरांचा परिणाम युरोप आणि अमेरिकेतही जाणवू लागला आहे. ट्रम्प यांच्यासमोरील आव्हान अधिक गंभीर झाले आहे, कारण त्यांच्या मित्रदेशांनी आणि नाटो देशांनीही होर्मुज मार्गाच्या सुरक्षेसाठी नौदल पाठवण्यास नकार दर्शविला आहे. त्यामुळे ट्रम्प आंतरराष्ट्रीय पातळीवर काहीसे एकाकी पडल्याचे चित्र आहे. त्यांना जगाला संकटाकडे ढकलणारे नेतृत्व म्हणून पाहिले जाऊ लागले आहे. देशांतर्गतही त्यांच्या विरोधात आवाज वाढत आहेत.

इराणकडून खाडी देशांतील ऊर्जा प्रकल्पांवर होत असलेल्या हल्ल्यांमुळे ऊर्जा संकट आणखी तीव्र करण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट दिसतो. या संकटावर नियंत्रण ठेवण्यात अमेरिका फारशी यशस्वी ठरत नाही, तरीही ट्रम्प यांची भूमिका आक्रमकच आहे. अमेरिकन संसदेकडून मंजुरी न घेता त्यांनी इराणवर हल्ला कसा केला, यावरून त्यांच्यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने राजीनामा देत असे म्हटले की, इराणकडून अमेरिकेला कोणताही तातडीचा धोका नव्हता आणि तो अणुबॉम्ब बनवण्याच्या उंबरठ्यावरही नव्हता.

अमेरिकेने इतर देशांवर मनमानी पद्धतीने हल्ले करण्याचा इतिहास नवीन नाही. व्हिएतनाम युद्ध, इराक युद्ध, अफगाणिस्तान युद्ध आणि लिबिया हस्तक्षेप यांसारख्या घटनांतून हे दिसून आले आहे. काहीवेळा या कारवायांना वैधता मिळाली, कारण संयुक्त राष्ट्र किंवा युरोपीय देशांनी त्या देशाच्या कारवायांवर आक्षेप घेतला होता. अनेकदा अमेरिकेने आत्मसंरक्षणाचा अधिकार किंवा जनसंहारक शस्त्रांचा धोका यांचा आधार घेतला.

अमेरिकेत काही असे कायदे आहेत, जे आत्मसंरक्षणाच्या नावाखाली इतर देशांमध्ये लष्करी हस्तक्षेप करण्यास परवानगी देतात. 9/11 हल्लेनंतर करण्यात आलेल्या “सैन्य बल वापर प्राधिकरण” (Authorization for Use of Military Force) या कायद्याचा आधार घेऊन ट्रम्प यांनी इराणवर हल्ला केल्याचे सांगितले. त्यांनी राष्ट्राध्यक्षांच्या युद्धसंबंधी अधिकारांचा दाखला देत या कारवाईचे समर्थन केले, मात्र अनेक कायदेतज्ज्ञांच्या मते ही कारवाई बेकायदेशीर ठरू शकते.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष हे सैन्याचे सर्वोच्च कमांडर असले तरी औपचारिक युद्ध जाहीर करण्याचा अधिकार संसदेकडे असतो. आपत्कालीन परिस्थितीत राष्ट्राध्यक्ष संसदेला न विचारता लष्करी कारवाई करू शकतात, परंतु ४८ तासांच्या आत संसदेला माहिती देणे आणि ६०-९० दिवसांत मंजुरी न मिळाल्यास कारवाई थांबवणे आवश्यक असते. मात्र राष्ट्राध्यक्षांकडे संसदेच्या निर्णयावर व्हेटो करण्याचाही अधिकार असल्याने सत्ता अधिक केंद्रीत होते.

अमेरिका हा जगातील एक प्राचीन लोकशाही देश मानला जातो, परंतु राष्ट्राध्यक्षांना दिलेले व्यापक अधिकार अनेकदा गैरवापरासाठी पोषक ठरतात. विशेषतः ट्रम्प यांसारखा आक्रमक आणि अहंकारी नेता सत्तेत असताना ही परिस्थिती जागतिक व्यवस्थेसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे अमेरिकेने स्वतःच्या लोकशाही व्यवस्थेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष अनेकदा इतर देशांवर आर्थिक निर्बंध लादतात किंवा आयातीवर मनमानी दर लावतात. अमेरिकन सर्वोच्च न्यायालयने ट्रम्प यांच्या काही शुल्क धोरणांना अवैध ठरवले असले, तरी ते इतर मार्गांनी पुन्हा अशा उपाययोजना करण्याचा प्रयत्न करत आहेत.

अमेरिका लष्करी आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत शक्तिशाली असल्याने त्याला मनमानी करण्याची क्षमता आहे. इतर देशांमध्ये लष्करी हस्तक्षेप किंवा सत्तांतर घडवून आणण्याच्या बाबतीत त्याची भूमिका अनेकदा हुकूमशाहीसारखी वाटते. अलीकडे व्हेनेझुएला संदर्भातील घडामोडी, तसेच ग्रीनलँड किंवा क्यूबाबाबतच्या धमक्या याच प्रवृत्तीचे द्योतक आहेत.

एकूणच, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना मिळालेल्या व्यापक अधिकारांचा गैरवापर केवळ अमेरिकन लोकशाहीसाठीच नव्हे, तर जागतिक स्थैर्यासाठीही धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे या सत्तासंतुलनाचा पुनर्विचार होणे ही काळाची गरज आहे.

# तेलाची नाडी इराणच्या हाती

हॉर्मुझ सामुद्रधुनी 2026 च्या सुरुवातीच्या महिन्यात पुन्हा एकदा भू-राजकीय (geopolitical) धोका आणि आर्थिक अडथळ्यांचे केंद्र बनली आहे. 2 मार्च 2026 रोजी इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स (Islamic Revolutionary Guard Corps) ने जाहीर केले की पर्शियन गल्फ आणि गल्फ ऑफ ओमान यांच्या दरम्यान असलेला हा अरुंद समुद्री मार्ग ज्या मार्गातून जगातील सुमारे 20 टक्के कच्चे तेल आणि मोठ्या प्रमाणात लिक्विफाइड नॅचरल गॅस दररोज वाहतूक होतो तो व्यावसायिक जहाजांसाठी प्रत्यक्षात बंद केला आहे. तसेच या मार्गातून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही जहाजावर हल्ला करण्याची धमकीही देण्यात आली आहे. इस्रायल आणि अमेरिकेसोबत वाढत चाललेल्या संघर्षानंतर, तसेच इराणच्या भूमीवर झालेल्या समन्वित हल्ल्यांनंतर, समुद्रात इराणने घेतलेली ही आतापर्यंतची सर्वात स्पष्ट आणि कठोर भूमिका ठरली आहे.

या वाढलेल्या तणावाचा तात्काळ आणि स्पष्ट परिणाम म्हणजे नियमित जहाज वाहतुकीत झालेली मोठी घट. वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय तेल टँकर कंपन्या आणि कंटेनर जहाज चालवणाऱ्या कंपन्या बुकिंग थांबवत आहेत आणि या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक रद्द करत आहेत. त्याच वेळी विमा कंपन्या संरक्षण (insurance coverage) काढून घेत आहेत, ज्यामुळे हॉर्मुझमधून व्यापार करणे व्यावसायिकदृष्ट्या जवळजवळ अशक्य बनले आहे. जगातील सुमारे 10 टक्के कंटेनर जहाजांचा ताफा सध्या हॉर्मुझजवळ अडथळ्यात अडकलेला आहे, आणि ही परिस्थिती स्पष्टपणे दाखवते की भू-राजकीय धोका किती वेगाने वाहतूक व्यवस्थेला ठप्प करू शकतो.

या घडामोडींनी आंतरराष्ट्रीय ऊर्जा बाजारात मोठी हलचल निर्माण केली आहे. इराणने सामुद्रधुनी बंद करण्याचा इशारा दिल्यानंतर कच्च्या तेलाच्या किमती झपाट्याने वाढल्या. ब्रेंट क्रूड (Brent crude) ची किंमत 8.6 टक्क्यांनी वाढली, कारण टँकर वाहतूक थांबवल्याच्या आणि तणाव वाढत असल्याच्या बातम्या येत होत्या. या किमती वाढीत बाजारातील मानसिकता (market psychology) तसेच प्रत्यक्ष पुरवठा कमी होण्याची शक्यता या दोन्ही गोष्टी दिसून येतात. व्यापारी दीर्घकाळासाठी अडथळे निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेत आहेत, कारण हा समुद्री मार्ग आशिया, युरोप आणि इतर भागांकडे जाणाऱ्या ऊर्जा पुरवठ्याला आधार देतो. त्याच वेळी अधिकारी आणि गुंतवणूकदारांना हेही समजते की हॉर्मुझमध्ये अगदी थोड्या काळासाठी अडथळा निर्माण झाला तरी वाहतूक, उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रांमध्ये खर्च वाढू शकतो. जहाज वाहतूक विश्लेषण (shipping analytics) अहवालांनुसार आशियाकडे जाणाऱ्या अतिशय मोठ्या कच्च्या तेलाच्या टँकरसाठी भाडे मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यामुळे एका मार्गावर वाढलेला धोका कसा जागतिक वाहतूक बाजारावर परिणाम करतो हे स्पष्ट होते. विमा प्रीमियम सुमारे 50 टक्के पर्यंत वाढल्यामुळे वाहतूक व्यवस्थेतील खर्च आणखी वाढले आहेत, ज्यामुळे व्यापार मंदावतो आणि जहाज कंपन्या तसेच वस्तू खरेदीदारांच्या नफ्यावर दबाव येतो.

हॉर्मुझचे समुद्री मार्ग म्हणून असलेले महत्त्व अतिशय मोठे आहे. सर्वात अरुंद ठिकाणी सुमारे 33 किमी रुंदी असलेली ही सामुद्रधुनी जगातील सर्वात महत्त्वाच्या समुद्री मार्गांपैकी एक आहे. सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कुवेत, कतार आणि इराण या देशांमधून निघणारे तेल, वायू आणि पेट्रोकेमिकल्स (petrochemicals) यांची निर्यात जागतिक बाजारात पोहोचण्यासाठी याच मार्गाने जाते. त्यामुळे या सामुद्रधुनीचे बंद होणे हे केवळ प्रादेशिक तणावाचे ठिकाण नाही, तर जागतिक ऊर्जा सुरक्षेसाठीही मोठा धोका आहे. या संकटाचा तातडीचा परिणाम ऊर्जा क्षेत्रावर दिसत असला, तरी जागतिक पुरवठा साखळी एकमेकांशी जोडलेल्या असल्यामुळे त्याचे परिणाम इतर अनेक क्षेत्रांपर्यंत पसरतात. विशेषतः तेल टँकरसाठी समुद्री मालवाहतूक दर (maritime freight rates) मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.

